# संसारांत कसें वागावें ?

श्रीरामकृष्ण परमहंसांनीं वेळोवळीं केलेला उपदेश, त्यांचा एक भक्त 'एम्' यानें संवादरूपानें लिहून ठेवून तो 'श्रीरामकृष्णकथामृत' या ग्रंथांत प्रसिद्ध केला आहे. या ग्रंथाचें 'दि गॉस्पेल ऑफ श्रीरामकृष्ण' या नांवानें इंग्रजींत भाषांतर झालें आहे.

त्यांतील थोड्या भागाचा येथें अनुवाद करून दिला आहे.

भगवान् श्रीरामकृष्ण परमहंस हे एकदां अनेक भक्तजनांबरोबर बोलत बसले होते. माणसानें जगांत कसें वागावें यासंबंधीं कोणी प्रश्न विचारला. सर्व जग हें ईश्वरमय असल्याचा सिद्धांत खरा असला तरी व्यवहारांत वागतांना माणसानें कोणता विचार ठेवून वागलें पाहिजे हें सांगतांना रामकृष्ण म्हणाले :—

'पाणी हें ईश्वराचेंच एक व्यक्त स्वरूप आहे असें पोथींत सांगितलेलें आहे. पण पाण्यांतहि भेदाभेद असतो. कांहीं पाणी देवपूजेला चालतें, कांहीं तोंड धुवायला उपयोगी असतें तर कांहीं नुसतें धुण्या-भांड्यांच्या कामाचेंच असतें. धुणीं-भांडीं ज्यानें स्वच्छ करायचीं तें पाणी आपण पिण्यासाठीं वापरत नाहीं, किंवा पूजेसाठींहि घेत नाहीं. तसेंच हें आहे. देव सर्वत्र भरून राहिलेला आहे हें खरें. पवित्र-अपवित्र, सज्जन-दुर्जन यांमध्यें सर्वांत परमेश्वर आहे. पण म्हणून माणसानें अपवित्र, दुष्ट, दुर्जन अशा माणसाशीं व्यवहार ठेवूं नये. त्यांच्यांत मिसळून जाऊं नये. यांपैकीं कांहींशीं फार तर बोलणें चालणें ठेवावें, पण इतरांशीं एवढाहि संपर्क ठेवूं नये. अशा माणसांपासून अलिप्त राहणें हेंच चांगलें.

**एक भक्त**—महाराज, एखादा दुष्ट माणूस आपल्याला इजा करण्याच्या बेतांत असला अथवा आपलें कांहीं अनिष्ट प्रत्यक्ष करीत असला तर आपण गप्प रहावें काय ?

**भगवान्**–दुष्ट वृत्तीच्या माणसांपासून स्वतःचें रक्षण करण्यासाठीं संसारी माणसानें तामसी वृत्तीचा देखावा करावा. परंतु आपल्याला कोणी इजा देईल या अपेक्षेनें आपण अगोदरच त्याला इजा करायची असें करूं नये.

'एक गोष्ट ऐका. कांहीं गुराखी गुरें घेऊन एका कुरणांत जात असत. त्या कुरणांत एक भयंकर विषारी साप राहात असे. तिकडून जाणारा प्रत्येक माणूस त्या सापाच्या भीतीनें अति सावधपणें चालत असे. एके दिवशीं एक ब्रह्मचारी त्या कुरणां-

तून जात होता. ते गुराखी धांवत त्यांच्याकडे आले आणि म्हणाले, ‘महाराज, या बाजूनें जाऊं नका. इथें एक विषारी साप राहातो.’ ब्रह्मचारी म्हणाला, ‘राहीना! मला त्याची कांहीं भीति नाहीं. मला सापावरचे मंत्र माहीत आहेत.’ असें म्हणून तो तसाच पुढें चालूं लागला. ते गुराखी मात्र घाबरून पुढें गेले नाहींत. एवढ्यांत तो साप फणा उभारून सळसळत पुढें आला. तो जवळ येतांच यानें एक मंत्र म्हटला. त्याबरोबर तो साप एखाद्या गांडुळासारखा त्याच्या पायाशीं निपाचित पडला. ब्रह्मचारी त्या सापाला म्हणाला, ‘हें बघ! तूं दुसऱ्यांना इजा देत कां फिरतोस? चल, मी तुला एक मंत्र देतों. त्या मंत्रजपानें तुझी ईश्वरावर भक्ति जडेल. अखेर तुला ईश्वरसाक्षात्कार होईल आणि तुझी हिंसक वृत्ति पार नाहींशी होऊन जाईल.’ असें म्हणून त्यानें त्या सापाला मंत्र दिला आणि त्याला आध्यात्मिक साधनेची दीक्षा दिली. सापानें आपल्या गुरूच्या चरणीं विनम्र होऊन म्हटलें, ‘महाराज, मी ही साधना कशी आचरूं?’ गुरु म्हणाला, ‘मंत्राचा सदैव जप कर, आणि कोणालाहि इजा करूं नकोस’ नंतर निघतांना तो ब्रह्मचारी त्याला म्हणाला, ‘मी परत येऊन तुला भेटेनच.’

‘कांहीं दिवस गेले. हा साप आतां चावेनासा झाला आहे हें त्या गुराख्यांच्या हळूहळू ध्यानांत आलें. ते त्याच्यावर दगड फेंकूं लागले. तरीहि तो साप फुस्कारून चावायला येईना. एखाद्या गांडुळासारखा तो निरुपद्रवी असावा असें वाटण्यासारखें तो वागूं लागला. एके दिवशीं एक गुराखी पोरगा त्याच्या अगदीं जवळ आला, त्याची शेपटी धरून त्यानें त्याला उचललें, गरगरां गरगरां फिरवून त्यानें त्याला अनेकवार जमिनीवर आपटलें आणि शेवटीं त्याला दूर भिरकावून दिलें. साप रक्त ओकला आणि बेशुद्ध झाला. त्याचें सर्वांग बधिर झालें होतें. त्याला जरा हलायचीही शक्ति उरली नव्हती. तो मेला असें समजून ते गुराखी निघून गेले.

‘बरीच रात्र उलटून गेल्यावर साप शुद्धीवर आला. हळूहळू मोठ्या कष्टानें सरपटत तो आपल्या बिळांत गेला. त्याच्या आंगाचीं हाडें मोडलीं होतीं आणि जागचें हालणें त्याला दुष्कर झालें होतें. असे पुष्कळ दिवस गेले. तो साप आतां नुसता कातडीनें झांकलेला शुद्ध सांगाडा असा बनला होता. कधींमधीं रात्रीं तो अन्न शोधायला बिळाबाहेर पडे. त्या गुराखी मुलांच्या भयानें तो दिवसाचा बिळा-बाहेर कधीं येतच नसे. त्या गुरूपासून मंत्रदीक्षा घेतल्यापासून त्यानें दुसऱ्याला इजा करण्याचें सोडून दिलें होतें. पालापाचोळा आणि झाडावरून पडलेलीं फळें यावर तो उपजीविका करूं लागला होता.

‘एका वर्षभरानें तो ब्रह्मचारी त्या बाजूला फिरत फिरत आला आणि त्या सापाची चौकशी करूं लागला. त्या गुराखी पोरांनीं त्याला सांगितलें कीं तो साप मेला. पण जी मंत्रदीक्षा सापानें घेतली होती तिचें फळ मिळेपर्यंत साप मरणार नाहीं हें त्याला ठाऊक होतें. तेव्हां तो त्या सापाच्या बिळापाशीं गेला आणि त्यानें सापाला जें नांव ठेवलें होतें त्या नांवानें तो त्याला हांक मारूं लागला. गुरूची हांक ऐकून तो साप बिळाबाहेर आला आणि गुरुचरणीं विनम्र होऊन राहिला. ब्रह्मचारी म्हणाला, ‘कसें काय चाललें आहे तुझें?’

साप म्हणाला, 'ठीक चाललें आहे.' ब्रह्मचाऱ्यानें विचारलें, 'अरे, तूं इतका क्षीण कशानें झालास?' साप उत्तरला, 'महाराज, कोणालाहि इजा करूं नकोस असा उपदेश तुम्हीं मला दिलात. तेव्हांपासून मी पाला व फळें यावर राहातों आहें. कदाचित् त्यामुळें मी कृश झालों असेन.'

'त्या सापांत सत्त्वगुण जागृत झाला होता. त्यामुळें त्याला कोणाबद्दलहि क्रोध उत्पन्न होत नसे. त्या गुराख्यांनीं आपला जवळ जवळ जीव घेतला होता हें तो विसरूनच गेला होता.

'ब्रह्मचारी म्हणाला, 'केवळ अन्नाच्या योगानें तुझी अशी दशा होणें शक्य नाहीं. दुसरें कांहीं तरी कारण खास असलें पाहिजे. जरा विचार करून पहा.'

नंतर सापाला आठवलें, कीं त्या पोरांनीं आपल्याला जमिनीवर आदळलें होतें. तें आठवून तो म्हणाला, 'महाराज, आतां मला आठवतें. त्या मुलांनीं मला एकदां एकदां जमिनीवर जोरानें आपटलें होतें. कांहीं झालें तरी अजाणच तीं. माझ्या चित्त-वृत्तींत काय बदल झाला आहे हें त्यांनीं ओळखलें नव्हतें. मी कोणाला दंश किंवा इजा करणार नाहीं हें त्यांना कसें समजणार?' ब्रह्मचारी उद्‌गारला, 'कमाल झाली तुझी! इतका कसा मूर्ख तूं? आपलें संरक्षण कसें करावें हेंहि तुला कळत नाहीं! कोणाला चावूं नकोस असें मीं तुला सांगितलें होतें, पण कोणावर फुस्कारूंहि नको असा उपदेश मीं केला नव्हता. फुस्कारून तूं त्यांना घाबरवून दूर पळवून कां लावलें नाहींस?'

'तेव्हां दुर्जनांवर फुस्कारावें. तुम्हांला त्यांनीं इजा करूं नये यासाठीं त्यांना भीति घालून ठेवावी. मात्र त्यांना कधींहि विषदंश करूं नये. दुसऱ्याला केव्हांहि इजा करूं नये.

'ईश्वराच्या या सृष्टींत विविध वस्तुजात आहे. माणसें, जनावरें, वृक्ष, लता. जनावरांत कांहीं चांगलीं आहेत तर कांहीं वाईट वाघासारखीं हिंस्र जनावरें आहेत. त्याचप्रमाणें माणसांत सज्जन, दुर्जन, पवित्र, अपवित्र असे भेद आहेत. कांहीं ईश्वर-भजनांत रमलेले आहेत तर कांहीं संसारांत गुंतलेले आहेत.

'माणसांचे चार प्रकार आहेत—बद्ध, मुमुक्षु, मुक्त आणि नित्यमुक्त.

'नारदासारखे महर्षि हे नित्यमुक्त होत. जगाला आध्यात्मिक ज्ञान देण्यासाठींच त्यांचा जन्म असतो. दुसऱ्याचें बरें करावें हेंच त्यांचें नित्यकर्म.

'जे बद्ध असतात ते सदैव संसारपाशांनीं जखडलेले असतात. ईश्वराची त्यांना कधीं आठवण होत नाहीं. चुकूनहि ते देवाचें नामस्मरण कधीं करणार नाहींत.

'या संसारबंधनांतून आपली सुटका व्हावी अशी मुमुक्षूंना आस असते. यांपैकीं कांहींना त्यांच्या यत्नांत यश मिळतें तर कांहीं अयशस्वी ठरतात.

'साधु, महात्मे यांसारखे जे मुक्त असतात ते संसारबंधनांतून सुटलेले व कनक–कान्ता यांच्या मोहापासून अलिप्त असे असतात. त्यांचें मन सांसारिकपणानें लिप्त झालेलें नसतें. शिवाय ईश्वराच्या चरणकमलांचें ते अहर्निश ध्यान करीत असतात.

'एखाद्या तळ्यांत मासे पकडण्यासाठीं जाळें टाकलें आहे असें समजा. कांहीं मासे फार चतुर असतात. ते जाळ्यांत केव्हांच सांपडत नाहींत. ते नित्यमुक्तांप्रमाणें होत. पण बरेच मासे जाळ्यांत सांपडतात. त्यांपैकीं कांहीं सुटून जायची धडपड करतात. हे मुमुक्षु. पण धडपड करतात ते सगळे सुटतातच असें नाहीं. कांहीं थोडेसेच निसटतात आणि डुबुक् करून पाण्यांत उड्या टाकतात. मग कोळी ओरडतात, 'बघा बघा ! तो एक मोठा मासा गेला.' पण जाळ्यांत पकडलेले बहुतेक मासे निसटून जाऊं शकत नाहींत. उलट त्या जाळ्यांतील चिखलांत ते अधिकाधिक आंत घुसतात. मनाशीं म्हणतात, 'आपल्याला आतां कांहीं भीति नाहीं. आपण इथें अगदीं सुखरूप आहोंत.' पण त्या बिचाऱ्यांना हें ठाऊक नसतें कीं ते कोळी जाळें बाहेर ओढून आपल्यालाहि तळ्याबाहेर काढतील. हीं संसारांत पूर्ण गुंतून राहिलेलीं माणसें.

'कामिनी–कांचनाच्या पाशांनीं हे बद्धात्मे संसाराशीं जखडलेले असतातात. त्यांचे हातपाय संसारांत संपूर्णपणें अडकलेले असतात.कामिनी–कांचनांनीं आपल्याला सुख मिळेल अशी त्यांची भावना असते. आपण त्यांच्या आधारानें सुखरूप राहूं असें त्यांना वाटत असतें. त्यांच्या नादानेंच आपला विनाश होणार आहे याची त्यांना जाणीवहि होत नाहीं. असा संसाराच्या जाळ्यांत पूर्ण गुंतलेला माणूस जेव्हां मरणाच्या दारीं पडतो तेव्हां त्याची बायको त्याला विचारतें, 'तुम्ही तर आतां चाललांतच पण तुम्ही माझ्यासाठीं काय केलें आहे ?' एवढ्यानेंच झालें नाहीं. याची संसाराची आसक्ती इतकी जबरदस्त असते कीं दिवा झगझगीत पेटतांना पाहून तो म्हणतो, 'जरा बारीक कर दिवा. किती तेल व्यर्थ फुकट जात आहे !' आणि हा स्वतः मृत्युशय्येवर पडलेला असतो !

'बद्ध जीव ईश्वरचिंतन कधींहि करायचे नाहींत. कधीं फुरसत मिळाली तर चकाट्या पिटीत बसतील, खुळ्यासारखे बडबडतील किंवा कसलें तरी निष्फळ काम करीत राहातील. तुम्ही त्यांच्या या अशा वागण्याचें कारण विचारलेंत तर ते म्हणतील, 'अहो, मला निरुद्योगी बसवत नाहीं. म्हणून हें कुंपण घालण्याचें काम काढलें आहे.' अगदींच वेळ जाईनासा झाला तर ते पत्ते कुटीत बसतील.'

खोलींत निस्तब्ध शांतता पसरलली.

**एक भक्तः**—'महाराज, अशा संसारी माणसाला तरणोपाय कांहींच नाहीं काय ?'

**भगवान्ः**—'नाहीं कसा ? नक्की आहे. वेळोवळीं त्यानें संतांच्या सहवासांत राहावें, मधून मधून एकान्तांत राहून ईश्वराचें ध्यान करावें. तसेंच नेहमीं नित्यानित्य विवेक करावा. 'देवा, मला श्रद्धा आणि भक्ति दे' अशी ईश्वराची प्रार्थना करावी. माणसाला श्रद्धेची एकदां प्राप्ति झाली कीं मग तो कांहींहि साध्य करूं शकेल. श्रद्धे-शिवाय दुसरें श्रेष्ठतर असें कांहीं नाहीं.

(केदारला उद्देशून) 'श्रद्धेचें सामर्थ्य केवढें प्रचंड असतें हें तूं ऐकलें असशील. पुराणांत सांगितलें आहे कीं, केवलब्रह्माचें व्यक्तस्वरूप असलेला, प्रत्यक्ष परमेश्वराचा

अवतार असा जो राम, त्यालाहि समुद्र ओलांडून लंकेला जाण्यासाठीं समुद्रावर सेतु बांधावा लागला. पण रामनामावर दृढश्रद्धा असलेला हनूमान् मात्र एका उडींतच समुद्र ओलांडून पलीकडच्या तीरावर जाऊन पोंचला. त्याला कांहीं सेतु बांधण्याची गरज भासली नाहीं. ( सर्व हंसतात. )

'एका दिवशीं एका माणसाला समुद्रपार व्हायचें होतें. तेव्हां बिभीषणानें एका पानावर रामाचें नांव लिहिलें, तें पान त्या माणसाच्या अंगावरील वस्त्राच्या टोंकाला बांधलें आणि तो त्याला म्हणाला, 'आतां घाबरूं नको. श्रद्धा ठेव आणि पाण्यावरून चालत जा. पण हें बघ ! ज्या क्षणाला तूं श्रद्धा गमावशील त्या क्षणाला मात्र तूं पाण्यांत बुडशील.' तो माणूस मजेंत पाण्यावरून चालत निघाला. वाटेंत त्याला वाटलें, आपल्या वस्त्राच्या टोंकाला काय बांधलें आहे तें पहावें तरी. त्यानें त्याप्रमाणें गांठ सोडली आणि पाहातों तो काय एक साधें पान ! त्यावर रामाचें नांव लिहिलेलें. 'ऑं ?' तो म्हणाला, 'ऑं ! फक्त रामाचें नांव ?' या उद्गारांसरशीं त्याच्या मनांत श्रद्धेच्या ऐवजीं संशयानें शिरकाव केला आणि तत्क्षणीं तो पाण्यांत बुडाला.

'ईश्वरावर श्रद्धा असेल तर त्या श्रद्धेनें माणूस निःसंशय आपला उद्धार करून घेईल. मग त्याच्या हातून गोहत्त्या, ब्रह्महत्त्या अथवा स्त्रीहत्त्या यांसारखें भीषण पाप का झालेलें असेना ! त्यानें फक्त देवापाशीं कळकळीनें म्हणावें, 'जगन्नाथा ! पुन्हां माझ्या हातून असलें कर्म कधींहि घडणार नाहीं.' नंतर त्याला कशाचें भय उरणार नाहीं.'

## आभार

श्रीयुत एच्. एस्. धारगळकर यांनीं चालू अंकावरील रंगीत ब्लॉक व गेल्या अंकांतील कांहीं ब्लॉक विनामूल्य करून दिले त्याबद्दल त्यांचे आम्ही ऋणी आहोंत. श्री. धारगळकर हे गांवदेवी येथील प्रेस प्रोसेस स्टुडिओ या कंपनीचे मालक आहेत. त्यांनीं दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानतों व पुढेंही ते 'श्रीसाईलीले' वर असाच लोभ ठेवतील अशी आशा बाळगतों.

—संपादक

* नाहीं देवापाशीं मोक्षाचें गांठोडें । आणूनि निराळें द्यावें हातीं ॥
इंद्रियांचा जय साधूनिया मन । निर्विषय कारण असे तेथें ॥
उपास पारणीं अक्षरांची आटी । सत्कर्मा शेवटीं असे फळ ॥

—श्रीतुकाराम

# आपलें कोठें चुकतें ?

— स्वामी रामदास —

आपल्याला जेव्हां दुःख भोगावें लागतें तेव्हां आपण इतरांना दोष देत सुटतों. पण ही मोठी चूक आहे. आपल्या दुःखाचें घर आपण स्वतःच आपल्या हातांनीं बांधीत असतों आणि आपण-होऊन त्यांत राहात असतों. पुष्कळदां अत्यंत क्षुल्लक दुःखाचा आपण उगाच मोठा बाऊ करीत असतों. निष्कारण राईचा पर्वत करण्याची संवय आपल्याला जडलेली असते.

एखादा माणूस आपला संशय घेत आहे, आपल्यावर निष्कारण कांहीं आळ घेत आहे, असें आपल्याला वाटतें. पण त्यानें असा संशय घेण्याला आपणच कांहींतरी कारण पुरविलेलें असतें हें मात्र आपण विसरतों. जाणूनबुजून अथवा नकळत आपणच इतरांच्या मनांत आपल्याविषयीं काळेंबेरें येण्यास कारण झालेले असतों. अशा वेळीं इतर काय करतात वा बोलतात इकडे लक्ष पुरविणें, आणि त्यांच्या वागण्या-बोलण्यामुळें आपल्या मनाशीं कुढत राहणें हें उचित नव्हे. आपण अशा वेळीं आपलें अंतरंग शोधून पाहावें, आपल्या स्वतःच्या चित्तांत किती मलिनता सांठली आहे ती निरीक्षण करावी आणि आपलें स्वतःचें हें मनोमालिन्य दूर करण्याच्या उद्योगास लागावें. प्रार्थना आणि ईश्वरार्पणवृत्ति हीं मनाची मलिनता घालविण्याचीं साधनें आहेत.

आपली दृष्टि आपण थोडीशी विशाल बनवूंया. सबंध जग आणि आपण यांमधील संबंध आपण ओळखून वागूंया. कधीं कधीं जगाशीं अगदीं फटकून आपण वागत असतों. कधीं विचित्रासारखी मुखस्तंभता आपण धारण करीत असतों. या प्रकारच्या वर्तनानें जगाचा आपल्याबद्दल गैरसमज झाला तर कांहींच नवल नाहीं. जगांत कसें वागावें हें जर आपल्याला समजलें नाहीं, केव्हां आणि कसें बोलावें हें जर आपण ओळखलें नाहीं, तर जगाची आपल्याविषयीं गैरसमजूत होणारच. त्यांत इतरांचा काय दोष ? चूक आपली असते हें आपण प्रथमतः ओळखायला शिकलें पाहिजे.

मोकळें आणि प्रसन्न अंतःकरण याच्यासारखी बहुमोलाची आणि अवश्य संग्राह्य वस्तु जगांत दुसरी कोणतीहि नाहीं. दयाशीलता, प्रेम आणि परोपकारप्रवृत्ति यांनीं भरलेलें अंतःकरण याहून दुसरी मौल्यवान् वस्तु जगांत नाहीं.

आपल्या सगळ्या दुःखाचें प्रमुख कारण कोणतें असेल तर तें म्हणजे मनावर ताबा नसणें हें होय. आपणच आपल्या हातांनीं आपल्या बिछान्यावर कांटेकुटे पसरतों आणि मग ते कांटे आपल्याला बोंचतात-खुपतात म्हणून आक्रोश करतों ! अशा

स्थितींत दुसऱ्यांच्या नांवानें बोटें मोडण्यांत काय अर्थ आहे बरें ? आपल्या अंतरंगांतील सर्वश्रेष्ठ अंतरतत्त्याशीं आपण एकनिष्ठ राहिलों, तर आपलें मन कोणीहि विचलित करूं शकणार नाहीं, आपल्याला दुःखी करण्याचें सामर्थ्य कोणालाहि उरणार नाहीं. पण आपण स्वतःच दुःखाला मिठी मारून राहिलों तर मात्र देवहि आपली सोडवणूक करूं शकणार नाहीं. यासाठीं ही सगळी पिरपीर आणि चिडचिड दूर झुगारून देऊंया. आपला सारा अहंकार बाजूस ठेवूंया. दया, सौजन्य आणि औदार्य यांनीं आपलें अंतःकरण भरून टाकूंया; संकुचितपणा, क्षुद्रपणा आणि दूषित पूर्वग्रह यांपासून सदैव दोन हात दूर राहूंया; उमेदपणा, उदार दृष्टि आणि सहानुकंपा यांनाच चित्तांत सदैव स्थान देऊंया.

परम आनंद आणि परम शांति यांचा उपभोग घेण्यासाठीं आपण जगांत आलों आहोंत. तेव्हां आडमार्गानें जाऊन या दोहोंचा नाश आपल्या हातांनींच करण्याचें कृत्य आपण होऊं देतां कामा नये. सरळ वाट सोडून आडवाटेला लागण्यांत आपलेंच नुकसान आहे. आपल्या सुखदुःखांत ईश्वर आड येत नाहीं, अथवा जगहि ढवळाढवळ करीत नाहीं आपल्यासमोर अमृताचा ठेवा आहे. पण हें अमृत लाथाडून आपण पुढें जातों आणि गढूळ पाणी गटागट पिऊं लागतों ! हा दोष कुणाचा ? केवळ आपलाच नव्हे काय ?

आपलें मन भलत्या वाटेला लागलेलें आहे. त्याला भलभलते विचार करण्याची संवय लागली आहे. अनेक अनिष्ट वासनांनीं आपल्या मनाचा ताबा घेतला आहे. मनाला या आडवाटेंतून सरळ मार्गावर आणण्यासाठीं, विचाराची योग्य दिशा त्याला लावण्यासाठीं आणि वासनांच्या पाशांतून त्याची मुक्तता करण्यासाठीं अत्यंत परिणामकारक ठरणारें एकमेव साधन आहे. तें साधन म्हणजे ईश्वरनामाचें संतत स्मरण हें होय. ईश्वरनामाचा महिमा फार मोठा आहे. रामनामाचा सतत जप करा कीं तुमचीं सारीं दुःखें चटसारीं पळून जातील.

( मासिक ' व्हिजन ' वरून. )

## राष्ट्रवाणी ( गुजराथी साप्ताहिक )

### संपादक—रमणिकलाल एन्. सरैया

हें राष्ट्रोन्नतीस वाहिलेलें साप्ताहिक असून त्यांत राजकीय, धार्मिक आणि औद्योगिक विषयांवर लेख, लघुकथा साप्ताहिक भविष्य चुटके वगैरे ह्यांचा समावेश केलेला आढळून येतो. राजकीय लेख बुद्धीला चालना देणारे आहेत. प्रस्तुत अंकांत साईबाबांच्याविषयीं साईभक्तांना पसंत पडेल असें लिखाण आहे. ह्या उपक्रमाबद्दल आम्हीं संपादक श्री. रमणिकलाल सरैया यांचें अभिनंदन करतों.

# शाश्वत सुखाचा लाभ कसा होईल?

ह्या प्रश्नावर
श्री रमण महर्षि
यांचें उत्तर

श्रीरमणमहर्षींच्या आश्रमांतील एक प्रसंग. एकदां एका ग्रंथाचें वाचन चाललें होतें. वाचतां वाचतां असा एक प्रश्न आला कीं, जग हें सुखासाठीं निर्माण झालें आहे कीं दुःखासाठीं? हा प्रश्न निघतांच ग्रंथ वाचणारा थांबला आणि महर्षींकडे पाहूं लागला. या प्रश्नाचें उत्तर महर्षि काय देतात हें ऐकण्यासाठीं उत्सुक होऊन, तेथें बसलेल्या सर्व मंडळींचे डोळे महर्षींकडे लागले.

श्रीरमण महर्षि म्हणाले, 'हें सर्व विश्व मूलतः चांगलें नाहीं किंवा वाईटहि नाहीं. तें सदैव जसें असायचें तसेंच असतें. मनुष्य नाना प्रकारचे अर्थ या विश्वस्वरूपावर बसवीत असतो. आपल्या विशिष्ट दृष्टिकोणानें माणसाचें मन जगाकडे पाहतें आणि आपल्या प्रवृत्तीनुसार विविध अर्थ लावतें. एखादी स्त्री ही तिच्या दृष्टीनें केवळ 'एक स्त्री' आहे. पण एक मन तिला म्हणतें, 'आई' तर दुसरें म्हणते 'ताई' तर तिसरें म्हणते 'मावशी.' एकच स्त्री अनेकांच्या दृष्टीला विविध रूपांनीं व नात्यांनीं दिसत असते. पुरुष स्त्रियांवर प्रेम करतात, सापाला घाबरून दूर पळतात आणि रस्त्याच्या कडेच्या दगडधोंड्यांकडे अथवा गवताकडे निर्विकार चित्तानें पाहतात. जगांतील विविध वस्तु आणि आपण यांच्यामध्यें जो हा भावनामय संबंध असतो, तो संबंध जगांतील सर्व सुखदुःखांना कारण होतो. विश्व हें एखाद्या वृक्षासारखें आहे. त्याच्यावरील फळें खाण्यासाठीं अथवा आसरा घेण्यासाठीं पक्षी त्या झाडाकडे येतात. माणसें त्या वृक्षाखालीं सांवलीसाठीं बसतात. तर एखादा माणूस स्वतःला फांस लावून घेण्यासाठीं त्या झाडाच्या फांदीचा उपयोग करतो. त्या वृक्षाचा असा विविध रूपांनीं उपयोग केला जात असला तरी तो स्वतः मात्र या अनेक घटनांपासून अलिप्त असतो. तो असायचा तसा असतो.

'माणसाचें मन हें स्वतःच आपलीं सारीं दुःखें निर्माण करतें आणि नंतर 'मला कोणी साहाय्य करील काय' म्हणून आक्रोश करीत बसतें. एकाला शांतिसमाधान द्यावें आणि दुसऱ्याला दुःखांत पिचत ठेवावें असें करण्याइतका ईश्वर पक्षपाती आहे काय? या विश्वांत प्रत्येक गोष्टीला वाव आहे, सर्वांचा समावेश आहे.

'पण जें जें शिव, कल्याणप्रद, निरामय आणि सुंदर आहे, तेंच तेवढें पाहण्याचें माणूस टाळतो आणि 'मी दुःखांत बुडालों आहें' म्हणून छाती पिटीत राहतो. एखाद्या भुकेलेल्या माणसासमोर पंचपक्वान्नानीं भरलेलें ताट असतांना, हात पुढें करून तीं पक्वान्नें खायचें सोडून, 'मला भूक लागली आहे' म्हणून तो रडत-आक्रंदत बसावा, तसें आपलें वागणें असतें ! समोर सुखसमाधानाचें भांडार असतांना जर आपण दुःखांतच पिचत राहिलों तर तो दोष ईश्वराचा कीं माणसाचा ? पण अशी स्थिति असली तरी माणसाचें सुदैव म्हणून, ईश्वर त्याला कधीं विसरत नाहीं. आपल्या चुका सुधारण्यासाठीं आणि सुखाचा सुयोग्य मार्ग चोखाळण्यासाठीं मार्गदर्शक गुरु आणि शास्त्रें यांची तरतूद ईश्वरानें करून ठेवली आहे. गुरूचा उपदेश आणि शास्त्रनिर्दिष्ट मार्ग यांचा जो कोणी अवलंब करील त्याला शाश्वत सुखाचा लाभ होईल यांत तिळमात्र शंका नाहीं.'

एका भक्तानें म्हटलें, 'या जगांतील विविध सुखें निरुपयोगी आहेत, परिणामीं यातनाकर आहेत हें आम्हांला समजतें. तरीहि त्या सुखांबद्दलची मनांतील आसक्ति जात नाहीं. या वासनेचा निरास करण्याचा उपाय काय ?'

महर्षि म्हणाले, 'ईश्वरचिंतन हा यावर उपाय आहे. सतत ईशचिंतन चालू राहिलें कीं वासना आपोआप गळून पडतील. 'विषयांची आसक्ति प्रथम नाहींशी होऊं दे म्हणजे मग आम्ही मागाहून पूजा आणि प्रार्थना सुरू करूं' असें म्हणून तुम्ही मन निर्विषय होण्याची वाट पाहूं लागलांत तर तुम्हांला फार फारच काळ थांबावें लागेल ! ईश्वराचें चिंतन तावडतोब चालू करा कीं आपल्या आसक्तीचे पाश हळूहळू ढिले पडत चालले असल्याचा तुम्हांला प्रत्यय येईल.'

* * *

* भूमी हाच पलंग दोन भुजही खाशी उशी टेकणा ।
रत्नांचा वर चांदवा गगनही वायू करी विंझणा ।
तेजस्वी शशिदीपही विलसती संगें विरक्ती सती ।
ऐशा अक्षय वैभवांत पहुडे योगी जसा भूपती ॥

× × ×

* हरिस्मरण विस्मरण तरि तुझें काय जिणें रे असून ॥ ध्रु० ॥
स्वार्थचि साधिसी सार्थक नेणसी कोणासि पाहा तरि पुसून ।
पुढें नाहिं गति मलिन झाली मति साधुचि संगत नसून ॥
रतिविलासीं लंपट होसी मानस गेलें डसून ।
लवकर सरकीं, पडशिल नरकीं, फुकट मरशिल कुसून ॥

—श्रीसोहिरोबानाथ

# ★ ★ सुखाचा मार्ग ★ ★

[ स्वामी विवेकानंद यांच्या 'कर्माचें रहस्य' या व्याख्यानांतील कांहीं उतारे येथें दिले आहेत. ते वाचकांना अत्यंत उद्‌बोधक आणि विचारप्रवर्तक वाटतील. आसक्तीचें सामर्थ्य, अनासक्तीचें बळ आणि दुःखनिवृत्तीचा खरा उपाय यांसंबंधीं स्वामीजींनीं केलेलें विवेचन वाचकांना खास विचार करायला लावील...... ]

आसक्ति हेंच सध्यां आपल्या सुखाचें साधन होऊन बसलें आहे. आपली आपल्या मित्रांबद्दल आसक्ति, आपल्या बुद्धीबद्दल आणि धर्मकर्माबद्दल आसक्ति, प्रत्येक बाह्यविषयाबद्दल आसक्ति—आणि हें सारें लटांबर गळयांत कशाकरतां बाळगायचें, तर सुख व्हावें म्हणून ! पण याचा परिणाम काय होतो म्हणाल, तर दुःख मात्र हटकून मिठी मारतें. खऱ्या आनंदाची प्राप्ती करून घेणें असेल, तर अनासक्त होण्यावांचून दुसरा उपाय नाहीं. आपल्याला इच्छा होण्याबरोबर या सर्वांना एकदम तोडून टाकण्याचें सामर्थ्य आमच्यांत असेल, तर आम्हांला दुःखें शिवणारहि नाहींत. अत्यंत आसक्त मनुष्य ज्या उत्साहानें एखाद्या कार्याच्या मागें लागतो, तितक्याच उत्साहानें एखादें कार्य करीत असतांहि, वाटेल त्या क्षणीं त्यांतून मोकळें होण्याचें सामर्थ्य ज्याला असेल, तोच मनुष्य शक्य तितकें सुख सृष्टीपासून मिळवूं शकतो. अत्यंत महत्त्वाची पण अत्यंत कठीण अशी गोष्ट हीच आहे कीं, कार्य करण्यास लागणारें आसक्तीचें बळ आणि त्यांतून बाहेर पडण्यास लागणारें अनासक्तीचें बळ हीं सारखींच माणसांत असलीं पाहिजेत.

कांहीं माणसें अशीं असतात कीं, बाह्यतः तीं अनासक्तशीं दिसतात. त्यांची कोणत्याच वस्तूबद्दल आसक्ति असत नाहीं. त्यांचें कोणावरच प्रेम नसतें. त्यांचें हृदय जणूंकाय दगडाचें बनलेलें आहे. जगापासून तीं सदोदित तोंड फिरविलेलीं. अशीं मनुष्यें कधीं दुःखांत चूर झालेलीं आढळायचीं नाहींत. पण या सृष्टींत त्यांची खरी किंमत काय असते ? या भिंतीला साऱ्या जन्मांत कधींतरी दुःख झालें होतें काय ? तिचें कोणावर कधीं प्रेम जडलें नव्हतें. ती अगदीं अनासक्त. पण शेवटीं भिंत ती भिंतच. नुसता चिखलाचा गोळा. असली भिंत होऊन बसण्यापेक्षां आसक्त होऊन दुःखें भोगणेंहि शतपट बरें. अशा रीतीनें भिंत होऊन जगांतील दुःखें टाळतां येतील हें खरें; पण जगांतील आनंदहि त्यामुळें टळतात आणि चित्ताला दौर्बल्यहि येतेंच, याकरतां दगड होऊन बसणें हेंहि योग्य नव्हे. हें आपलें साध्य नाहीं. दगडाचें जीवित हें आपलें इष्ट आहे काय ?

★

एखाद्या वस्तूच्या ठिकाणीं अत्यंत प्रेम जडणें हें सुद्धां एक प्रकारचें सामर्थ्य आहे. केवळ एखाद्याच विषयाकडे आपलें सारें लक्ष गुंतून राहतें; इतकें कीं आपल्याला त्यावांचून अन्य कशाचेंहि भान राहात नाहीं. आपला समूळ नाश होण्याची वेळ आली तरीहि त्या विषयाचा त्याग करावा असें आपल्या मनांत येत नाहीं. या गोष्टी सामर्थ्या-वांचून शक्य होतील काय? यालाहि सामर्थ्य लागतें. स्वतःला विसरून दुसऱ्याच्या समाधानासाठीं वाटेल ते हाल सोसायचे हा दैवी गुण आहे. यासाठीं अत्यंत आसक्तींत दिसून येणारें मनाचें सामर्थ्य तर आम्हांला हवेंच; पण आम्हांला नुसता दैवी गुण पैदा करून स्वस्थ बसायचें नाहीं. म्हणून त्या सामर्थ्याशिवाय आणखी अनासक्तीचें सामर्थ्यहि आम्हांस पाहिजे. आसक्तींत दिसून येणारें आणि अनासक्ति मिळविण्यास लागणारें अशीं दोन्ही सामर्थ्यें आम्हांस पाहिजेत. मनुष्याचें पूर्णत्व यांतच आहे. एकाच प्रेमाच्या विषयावर आपल्या आत्मिक शक्तीचें सर्व भांडार रिकामें करीत असतांहि, पूर्णत्व पावलेला मनुष्य त्या विषयाबद्दल अत्यंत उदासीन असतो. आतां हें दुहेरी कार्य कसें साधतें तें पाहिलें पाहिजे. याचें रहस्य जाणलें पाहिजे.

भिकारी मनुष्य कधीं सुखी असत नाहीं. त्याच्या जीवधारणापुरतें साधन त्याला कुठूनहि मिळतें. पण प्रत्येक वेळीं त्याचा जिकडेतिकडे तिरस्कारहि होतो. त्याला कितीहि मोठी प्राप्ति झाली तरी तिच्या पाठीमागें तुच्छतादर्शक दया आणि तिरस्कार हीं असायचींच. भिकारी म्हणजे कवडीच्या किंमतीचा नाहीं, असें दात्याला वाटल्याखेरीज राहात नाहीं. यामुळें त्याला मिळालेल्या साधनांपासून सुखप्राप्ति होत नाहीं.

आपणहि बहुतांशीं असल्याप्रकारच्या भिकाऱ्यांसारखेच आहों. आपण जें जें कांहीं करतों त्याचें प्रतिफल मिळावें अशी आपली अपेक्षा असते. आपण शुद्ध वैश्यवृत्तीचे लोक आहों. आपला तराजू सदोदित समतोल राखण्याची आपण फार काळजी बाळगीत असतों. हें आपलें वाणिज्य कांहीं विशिष्ट गोष्टीसंबंधींच असतें असें नाहीं. आयुष्यांतील सर्व प्रकारच्या खटपटींत तीच वृत्ति. मीं अमुक केलें त्याबद्दल मला अमुक पाहिजे हेंच सदोदित चिंतन. मोठा दानधर्म केला तर त्या पुण्यकृत्याबद्दल नांवाची टिमकी वाजली पाहिजे ही अपेक्षा आहे. धर्माच्या बाबतींतहि हेंच. अमुक मनुष्य धार्मिक आहे असें आपल्याला कोणी म्हटलें नाहीं तर आपला धर्म फुकट गेला असें आपणांस वाटतें. तीच गोष्ट प्रेमालाहि लागू आहे. निर्व्याज प्रेमाचें नुसतें वारेंहि आपल्या आंगा-वरून कधीं गेलेलें नाहीं. प्रेमांतहि अदलाबदलीची–व्यापाराची–आवश्यकता वाटावी हें अत्यंत शोचनीय आहे.

★

आपल्या जीवनक्रमांत खरी यशःप्राप्ति हवी असें वाटत असेल आणि खरें सुख मिळविण्याची इच्छा असेल तर एक तत्त्व सदैव लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. ज्याला प्रतिफलाची अपेक्षा नसते त्यालाच खऱ्या यशाची प्राप्ति होते.

कोणत्याहि कर्माबद्दल उलट कांहींतरी मिळावें अशी आशा बाळगू नका. तुम्हांला जें कांहीं द्यावयाचें आहे तें देऊन मोकळे व्हा. तें तुमचें तुम्हांला अवश्य परत मिळेल.

पण त्याबद्दल आज विचार करूं नका. तुमचें दान परत येईल तेव्हां तें एकटेंच न येतां आणखी बहुतांना बरोबर घेऊन येईल. पण त्यावर लक्ष ठेवून बसूं नका. जें कांहीं करणें असेल तें आज करून मोकळें व्हावयाचें, इतकाच विचार जागृत असावा. एक गोष्ट आपण पक्की लक्षांत बाळगली पाहिजे. ती ही कीं, आपला जन्म घेण्याकरतां नसून, देण्याकरतां आहे. प्रकृतीचा कायदा असा कडक आहे कीं, ती आपणांस सर्व कांहीं द्यावयास भाग पाडील. मग खुषीनें देण्यांतच शहाणपण नाहीं काय? साऱ्या आयुष्यभर आपण मुठी मिटीत असतों. मूठ पक्की कशी मिटतां येईल हाच विचार सदैव आपल्या चित्तांत घोळत असतो. पण अखेर वेळ अशी येते कीं, आपल्या नरड्यावर पाय देऊन प्रकृति आपल्या मुठी ढिल्या पाडते. त्या वेळीं तुमची खुषी असो अगर नसो, तुम्हांला मूठ ढिली करावीच लागते...याकरतां आपल्या-पाशीं जें कांहीं येतें तें देण्याकरतां येतें असें समजावें. दानाबद्दल उलट अपेक्षा करणें हें प्रकृतीच्या कायद्याविरुद्ध आहे. अधिक अधिक देत गेलां, तर अधिकाधिकाची प्राप्ति तुम्हांला आपोआप होईल.

★

अलिप्त राहावें असा बेत आपण रोज करीत असतों. आपण आपल्या पूर्वीच्या आयुष्यक्रमाचें कित्येक वेळां सिंहावलोकन करतों. त्या वेळीं ज्यांच्याबद्दल आपणांस आसक्ति वाटत होती असे सर्व विषय आणि माणसें आपल्या मनश्चक्षूं-समोर उभीं राहतात. त्यांपैकीं प्रत्येकानें आपणांस कसें गुलाम करून सोडलें होतें आणि शेवटीं आपणांस कसें दुःखें दिलें होतें, याचें आपणांस स्मरण होतें. आपण आपलें ईश्वरत्व पार विसरून जाऊन गुलामगिरीच्याच्या जाळ्यांत कसें सांपडलों होतों हें आपणांस दिसूं लागतें. 'प्रेम' या भपकेबाज नांवाखालीं मोडणाऱ्या गुलामगिरीला आपण त्या वेळीं मिठ्या मारीत होतों असें आपणांस समजून येतें. दुसरे आपणांस त्या वेळीं बाहुल्यासारखें नाचवीत होते, आणि प्रत्येक दिवशीं आपल्या ईश्वरत्वावर एकेक नवें पांघरूण पडत होतें याचें आपणांस स्मरण होतें. त्या वेळीं पुन्हां एकवार आपण निश्चय करतों कीं 'यापुढें आतां कसल्याच गोष्टीची आसक्ति बाळगायची नाहीं.' पण उपयोग काय? 'जंव न देखिलें पंचानना तंव जंबुक करी गर्जना' अशीच आपली स्थिति असते. पुन्हां आपल्याला मोह पडतो. पुन्हां आपला जीव आसक्तीच्या जाळ्यांत गुंततो.

★

एखादें दुःख प्राप्त झालें कीं आपला पहिला यत्न बाह्य कारण शोधून काढण्याचा असतो. ही संवय आपणांस लहानपणापासून जडली आहे. आपल्या अपयशाचें खापर कोणाच्या डोक्यावर फोडतां येईल, हेंच आपण प्रथम शोधूं लागतों. मग आपली खटपट लोकांची सुधारणा करण्याकरतां सुरू होते. आपली स्वतःची कांहीं चूक असेल असें आपल्या स्वप्नींहि येत नाहीं. जो काय अपराध असेल तो सारा दुसऱ्यांचा त्यांना अगोदर सुधारलें पाहिजे. आपण खरोखर शुद्ध घमेंडानंदन असतों. आपणांस कांहीं दुःख प्राप्त झालें म्हणजे प्रथम आपण बोलतों तें हेंच कीं 'काय हो! जग किती दुष्ट

आहे !' मग लोकांना शिव्याशाप देऊन म्हणायचें, 'यांच्यासारखे गाढव मीं कोठें पाहिले नाहींत !' पण शहाण्यांनो ! जर तुम्ही खरोखरच शहाणे आहां, तर असल्या दुष्ट जगांत राहतां कशाला ? जर या जगांत सर्वत्र राक्षसांची आणि दैत्यांची वस्ती असेल, तर आपण स्वतःहि त्यांपैकींच एक दैत्य नव्हे काय ? ' या जगांतले लोक सारे शुद्ध आपलपोटे !' खरें आहे ! निर्मळ सत्य आहे ! पण आपण त्यांहून अधिक चांगले असतों तर येथें येतों कशाला, याचा कांहीं विचार करा.

जें जें कांहीं आपणांस प्राप्त होतें, त्याला आपण सर्वथैव पात्रच असतों. आम्ही चांगले आणि जग वाईट असें जेव्हां आपण म्हणतों तेव्हां आपण शुद्ध खोटें बोलत असतों. जगाला उगीच थाप मारण्याचा आपला हा यत्न असतो. पण यामुळें असल्या थापा मारून आपण स्वतःलाच फसवीत असतो हें आपल्या ध्यानांत येत नाहीं; इतके तर आपण शहाणे आहों ! मग जग वेडें कीं आपण वेडे ?

अत्यंत महत्त्वाचा असा हा पहिला धडा आहे. ज्या वेळीं आपणांस दुःखाची प्राप्ति होते, त्या वेळीं दुसऱ्या कोणावर बोटें मोडण्याचें कारण नाहीं. खऱ्या शूराला अशी वागणूक सर्वथैव अनुचित आहे. शूर व्हा आणि दुःखाला तोंड द्या. आपला स्वतःचा दोष शोधून काढा. हाच खरा मार्ग आहे. आपल्या दुःखाबद्दल इतरांना दोष देण्यापेक्षां तो तुम्ही स्वतःलाच दिला तर सत्यमार्गानें गेल्याचें श्रेय तरी तुम्हांला मिळेल. स्वतःवर ताबा चालविण्यास तुम्ही शिकलां तर त्यांतच तुमचा फायदा आहे.

★

* सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता ।
परो ददातीति कुबुद्धिरेषा ॥
अहं करोमीति वृथाभिमानः ।
स्वकर्मसूत्रग्रथितो हि लोकः ॥

* जैसें मार्गेचि चालतां । अपायो न पवे सर्वथा ।
कां दीपाधारें वर्ततां । नाडळिजे ॥ तयापरी पार्था ।
स्वधर्मे राहाटतां । सकळ कामपूर्णता । सहजें होय ॥

—श्रीज्ञानेश्वर

* अभ्यासिले वेद जाला शास्त्रबोध । साधिल्या विदग्ध नाना कळा ॥
प्रेमाचा जिव्हाळा जंव नाहीं अंतरीं । तंव कैसा श्रीहरि करील कृपा ॥
वांझेचिया स्तनीं अमृताची धणी । मृगजळपाणी तान्हेलीया ॥
तरीच प्रेमेवीण फळती क्रियाकर्मे । हातीं येती वर्मे विठोबाचीं ॥

—श्रीनामदेव

# श्रीज्ञानेश्वर माउलीची ज्ञानोत्तर प्रेमभक्ति

## ( पुस्तक परीक्षण )

( लेखक : वाङ्मयप्रभु **खंडेराव सदाशिव त्रिलोकेकर** )

जरी हा देह क्षणभंगुर देख । तरी परमपुरुषार्थ साधक
जो प्रत्यक्ष मोक्षाहून अधिक । कीं भक्तियोग प्रदायक हा ॥ ६० ॥
चारी पुरुषार्थांच्या वरी । या पंचम पुरुषार्थाची पायरी ।
कांहीं न पावे या योगाची सरी । अलौकिक परी भक्तीची ॥ ६१ ॥

(श्रीसाईसच्चरित अ. २८)

हा ग्रंथ, श्रीयुत ज्ञानेश्वर माउलीचा एक चरणरज उर्फ ह. भ. प. श्री. नामदेव बापुजी काळे या विद्वान् गृहस्थांनीं लिहिलेला आहे. श्रीयुत काळे, हे वऱ्हाड भागांतील एक व्युत्पन्न आणि व्यासंगी असे भगवद्भक्त आहेत, ह्याची साक्ष त्यांच्या ग्रंथांत जागोजागीं पटते. अलीकडे दहाबारा वर्षांत ज्ञानेश्वरी वाङ्मयावर जे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत, त्या ग्रंथांत श्रीयुत काळे ह्यांच्या ग्रंथाचा क्रमांक बराच वर लागेल असें म्हणावयास हरकत नाहीं. विशेषतः, एक संग्रहणीय असा अध्यात्मिक संदर्भग्रंथ, ह्या नात्यानें ह्या ग्रंथाचें महत्त्व निर्विवाद मान्य करावें लागेल. भक्ति, ज्ञान, वैराग्य इत्यादि गोष्टींवर ह्या ग्रंथांत पुष्कळ ठिकाणीं उद्बोधक अशीं वर्णनें केलेलीं वाचून कोणत्याही अभ्यासू भक्ताला आनंद वाटल्यावांचून रहाणार नाहीं. इतके गुण ह्या ग्रंथांत असूनहि त्यांत, एक मोठें वैगुण्य राहिलें आहे. आणि तें हें कीं जो उद्देश डोळ्यांसमोर ठेवून हा ग्रंथ लिहिला गेला, तो उद्देश ह्या ग्रंथाच्या द्वारें साध्य झालेला दिसत नाहीं, असें आम्हांस वाटतें. ह्या ग्रंथाचें परीक्षण करतांना श्री ज्ञानेश्वर-माउलीच्या सुभाषिताप्रमाणें ' न्यून तें पुरतें । अधिक ते सरते । करोनि घ्यावें हें तुमतें । विनवितसे ' ह्या दृष्टीनें केलें आहे. नाहीं तर ग्रंथकारानें अत्यंत परिश्रम घेऊन एखादा मोठा ग्रंथ लिहावा आणि टीकाकारानें आपल्या एका लेखणीच्या फटकाऱ्यानें ग्रंथकाराच्या अभ्यासपूर्वक परिश्रमावर हल्ला करून ते श्रम मातीमोल ठरवावे. ह्या प्रवृत्ती-पासून अलिप्त राहणें हें सदयहृदय व रसिक टीकाकाराचें पहिलें कर्तव्य होय. ह्या कर्तव्याची जाणीव असल्यामुळें प्रास्ताविक भागांत ग्रंथाच्या विशिष्ट गुणांचें स्वरूप आम्हीं प्रथम वाचकांपुढें मांडिलें. आहे. परंतु टीकाकाराचें दुसरेंही एक पवित्र कर्तव्य आहे आणि तें म्हणजे एखाद्या ग्रंथाच्या सवंग स्तुतीच्या भरीस पडून वाचकांची दिशाभूल न होईल ह्याबद्दल दक्षता घेणें हें होय. ह्या दृष्टीनें प्रकृत ग्रंथाचा विचार केला असतां असा अनुभव येतो कीं ज्या प्रयोजनासाठीं कर्त्यांनीं हातीं लेखणी घेऊन एवढे परिश्रम घेतले तें उद्दिष्ट कार्य ह्या ग्रंथांत साध्य झालेलें दिसत नाहीं.

वरील विधानांची सत्यत्ता सुज्ञ व रसिक वाचकांस पटावी म्हणून ग्रंथकर्त्यांनीं आणि इतर पंडितांनीं ह्या ग्रंथाच्या हेतूबद्दल काय म्हटलें आहे हें वाचकांपुढें ठेवणें जरूर आहे. खुद्द ग्रंथकार आपल्या ग्रंथाविषयीं म्हणतात, "श्रीज्ञानेश्वर माउलीच्या तत्त्व-ज्ञानाविषयीं विद्वान मंडळीमध्यें मतभेद आहेत. डॉ. शं. दा. पेंडसे या बुद्धिमान्, विद्वान् आणि व्यासंगी गृहस्थांनीं 'श्रीज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान' हा प्रबंध चिकित्सक पद्धतीनें लिहिला आहे. ह्या प्रबंधांतील कांहीं विचार कांहीं विद्वानांना मुळींच पटलेले नाहींत. माउलीच्या वचनांच्या अर्थाविषयीं विद्वानाविद्वानांमध्यें मतभेद झाले असतां स्वानुभवी संतांनीं केलेले अर्थ स्वीकारणें अत्यंत श्रेयस्कर असतें." ह्याचा सरळ अर्थ असा कीं स्वानुभवी संतवचनांच्या आधारें डॉ. शं. दा. पेंडसे ह्यांच्या 'श्रीज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान' ह्या १९४० सालीं प्रसिद्ध झालेल्या प्रबंधाचा परामर्श घेण्याच्या प्रतिज्ञेनेंच केवळ हा ग्रंथ लेखकानें लिहिला आहे. ही गोष्ट ह्या ग्रंथास अमरावतीचे श्री. ना. भै. पंडित, ह्या पंडितांनीं जोडलेल्या अभिप्रायांतहि स्पष्टपणें नमूद केली आहे. ते म्हणतात 'नागपूरचे डॉ. शं. दा. पेंडसे यांनीं 'श्रीज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान' या निबंधांत 'श्रीज्ञानेश्वर योगी व ज्ञानी होते. त्यांची प्रमुख भूमिका भक्ताची नव्हती. ते साकार कृष्णाला परमेश्वर समजत नाहींत. ते चतुर्भुज रूपाला नित्य व खरें म्हणत नाहींत. त्यांची ज्ञानोत्तरभक्ति श्रीकृष्णप्रेमनिष्ठा नाहीं' अशा अर्थाचीं जीं विधानें केलीं आहेत तीं कशीं चूक व निर्मूल आहेत, हें श्रीज्ञानेश्वरमहाराज व निवृत्तिनाथ महाराज यांच्या वचनांधारें फारच उत्तम रीतीनें बिनतोड सिद्ध करून त्यांनीं दाखविलें आहे!' ह्या अभिप्रायावरून आणि ग्रंथकर्त्यांच्या वर उद्धृत केलेल्या प्रास्ताविक विधानांवरून 'श्रीज्ञानेश्वर माउलीची ज्ञानोत्तर प्रेमभक्ति' ह्या ग्रंथाचें महनीय उद्दिष्ट डॉ. पेंडसे ह्यांच्या 'श्रीज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान' ह्या प्रबंधाचें खंडण करणें हें होय, ह्याची वाचकांना ओळख पटेल.

अर्थात् येथपर्यंत वरील विवेचनावरून प्रकृत ग्रंथाच्या उद्दिष्टाचा परिचय वाचकांस करून दिल्यानंतर ह्या वादांतील आणखी कांहीं गोष्टींची रूपरेखा त्यांच्यापुढें ठेवणें जरूर आहे. कारण त्यावांचून ह्या पुस्तकांतील विवेचनाचें मर्म वाचकांस कळणार नाहीं. ह्या वादाची पूर्वपीठीका अत्यंत मनोरंजक व उद्बोधक असल्यामुळें ती थोडक्यांत वाचकांपुढें मांडणें अपरिहार्य आहे. ज्या डॉ. पेंडशांच्या 'श्रीज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान' ह्या प्रबंधावर प्रस्तुत ग्रंथ लिहिला गेला आहे, त्या प्रबंधाचें वैशिष्ठ्य व त्याचा पूर्वेतिहास काय आहे ह्याच्याकडे लेखकाचें सपशेल दुर्लक्ष झालेलें आहे, असें दिसतें.

डॉ. पेंडसे ह्यांच्या प्रबंधाचा उगम कोठें व कसा झाला ह्याचीं कारणें त्यांनीं 'विषय–प्रवेश' ह्या प्रकरणांत दिलेलीं आहेत. डॉ. पेंडसे विषय–प्रवेशाच्या उपसंहारांत आपल्या प्रबंधाच्या उद्दिष्टाविषयीं खालील विधान करतात. 'ज्ञानेशांना शंकराचार्यांचा अध्यात्मवाद किंवा मायावाद मान्य नाहीं, द्वैत हा भ्रम नाहीं, जगत् सत्य, द्वैत सत्य, सर्वांस उपलब्ध असलेली स्थितीच खरी आहे. ज्ञानेशांवर रामानुजमताचा परिणाम झाला होता. त्यांचें तत्त्वज्ञान पांचरात्र आणि वाल्लभ यांच्याशीं सदृश आहे. काश्मीरी शैव संप्रदायांतील जगत्प्रक्रिया त्यांनीं घेतलीं आहे, वगैरे अनेक प्रश्न पं. पांडुरंग शर्मा

यांनीं उपस्थित केले आहेत. परस्परविरोधी विधानेंहि त्यांच्या लेखांत आढळतात. ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाविषयीं असे मतभेद उत्पन्न झाल्यामुळें उपस्थित झालेल्या सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचें व मतभेदांचें परीक्षण आणि ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास करण्याचें या प्रबंधांत योजिलें आहे.'

वरील अवतरणावरून डॉ. पेंडसे यांच्या प्रबंधाचा पूर्वोतिहास काय आहे हें वाचकांना कळून येईल. १९२१ ते १९२३ पर्यंत **चित्रमयजगतांत** प्रसिद्ध झालेले श्री. पांडुरंग शर्मा यांचे लेख; त्या लेखांना उत्तर म्हणून १९४० सालीं प्रसिद्ध झालेला डॉ. पेंडसे यांचा 'श्रीज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान' हा प्रंबध आणि त्याचा परामर्श घेण्यासाठीं म्हणून लिहिलेला व १९५३ सालीं प्रसिद्ध झालेला प्रस्तुत 'श्रीज्ञानेश्वरमाउलीची ज्ञानोत्तर प्रेमभक्ति' हा ग्रंथ अशी ही ह्या ज्ञानेश्वरींतील तत्त्वज्ञानाच्या वादाची परंपरा आढळून येते.

या परंपरेवरून श्री. पांडुरंगशर्मा ह्यांची भूमिका काय होती आणि त्यांचें खंडण करणारे डॉ. पेंडसे ह्यांच्या प्रबंधाच्या टीकेची दिशा कोणती होती आणि ह्या टीकेसाठीं त्यांनीं टीकेचें कोणतें तंत्र अवलंबिलें होतें, ह्या गोष्टींकडे लक्ष पुरविणें जरूर आहे. कारण महाराष्ट्रांतील ज्या एका अत्यंत विद्वान गृहस्थांनीं डॉ. पेंडसे ह्यांच्या ग्रंथास प्रस्तावना लिहिली आहे, त्यांनीं 'श्रीज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान' ह्या ग्रंथांतील 'भाष्यकारांतें वाट पुसतु' ह्या प्रकरणास मुख्यत्वें करून प्राधान्य दिलेलें आहे. श्री. रा. द. रानडे आपल्या प्रस्तावनेंत म्हणतात, 'ल्युटोस्लास्की यानें 'प्लेटोच्या तर्कशास्त्राचा उद्गम आणि विकास' या ग्रंथांत जी आधुनिक चिकित्सक पद्धति (Critical Apparatus) योजिली आहे किंवा रोथ, पिशेल, गेल्डनर, डॉ. बेलवलकर इ. पंडितांनीं वैदिक वाङ्मयाच्या अभ्यासांत योजिली आहे तिचा डॉ. पेंडसे यांनीं ह्या ग्रंथांत उत्तम उपयोग केला आहे. याला 'भाष्यकारातें वाट पुसतु' हें प्रकरण उदाहरण म्हणून दाखवितां येईल. "भाष्यकारांतें वाट पुसतु' हें ह्या प्रबंधांतील सर्वांत मोठें प्रकरण आहे."

ह्या वरील मार्मिक अवतरणावरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं 'भाष्यकारांतें वाट पुसतु' हें प्रकरण म्हणजे डॉ. पेंडशांच्या ग्रंथांतील अजिंक्य असा बालेकिल्ला आहे; अर्थात् कोणत्याहि लेखकाला अगदीं सशास्त्र रीतीनें डॉ. पेंडसे यांच्या मतांचें खंडण करावयाचे असेल तर त्यांनीं 'भाष्यकारांतें वाट पुसतु' हा गड आधीं सर केला पाहिजे. ह्या मुख्य गडावर प्रतिहल्ला न चढवितां डॉ. पेंडसे ह्यांच्या ग्रंथांतील इतर मतांचें कितीहि खंडण केलें तरी त्या प्रयत्नांत कांहीं तथ्यांश नाहीं असेंच म्हणावें लागेल. आपल्या धार्मिक वाङ्मयांत अद्वैत, विशिष्टाद्वैत व द्वैताद्वैत हे मुख्य तीन वाद आहेत. श्रीमच्छंकराचार्य, श्रीरामानुजाचार्य आणि श्रीमध्वाचार्य हे तीन आचार्य ह्या वादांचे प्रणेते आहेत. ह्यांपैकीं ज्ञानेश्वरींत अद्वैतवाद आणि विशिष्टाद्वैतवाद यांचा समन्वय केला आहे. परंतु ही समन्वयाची दृष्टी सोडून 'ज्ञानेश्वरींत अद्वैत कीं भक्ति (म्हणजेच विशिष्टाद्वैतवाद) आहे?' हा वाद आजपर्यंत अनिर्णित राहिलेला आहे. ह्या बाबतींत जवळ जवळ अद्वैत आणि भक्ति यांचा छत्तीसाचा आंकडा आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. अशा परि-

स्थितींत अद्वैतवाद्यांचें खंडण करण्याच्या पवित्र्यावर आपण 'श्रीज्ञानेश्वरमाउलीची ज्ञानोत्तर प्रेमभक्ति' ह्या ग्रंथांत उभे राहिले आहोत ही जाणीव त्यांना नाहीं, असें स्पष्टपणें दिसतें. अद्वैतवादी श्रीमधुसूदनस्वामी, श्रीनिश्चलदासजी इत्यादि लेखकांनीं भक्तीवर कसा जोराचा हल्ला चढविला आहे हें प्रस्तुत लेखकांना ठाऊक आहे. त्यांनीं आपल्या ग्रंथांतील 'भगवन्नामरूपमहात्म्य' 'मुक्तस्वभावभगवद्विग्रहभजन' ह्या प्रकरणांत निश्चलदासजी व मधुसूदन यांची वचनेंहि दिलीं आहेत.

ह्या वचनांवरून तरी केवलाद्वैताला भक्तीचें वावडें आहे, आणि भक्तिमार्गी भागवतांना केवलाद्वैत मान्य नाहीं, हें तत्त्व प्रस्तुत लेखकांस चांगलेंच अवगत आहे असें त्यांच्या ग्रंथावरून दिसून येतें. अशा परिस्थितींत डॉ. पेंडशांचें खंडण करण्यासाठीं हे लेखक जेव्हां उभे रहातात त्यावेळीं पहिल्या सलामीलाच ते डॉ. पेंडशानां शरणचिठी देतांना आढळतात. इतकेंच नव्हे तर डॉ. पेंडशांचें खंडण करणाऱ्या टीकाकारावर ते घसरलेले दिसतात, असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. 'भाष्यकारातें (वाट) पुसतु' ह्या प्रकरणावर चर्चा करतांना ते जवळ जवळ पेंडशांच्याच बाजूचे आहेत ही गोष्ट त्यांच्याच ग्रंथांतील कांहीं विधानें घेऊन वाचकांपुढें ठेवल्यास आढळून येईल तीं विधानें कोणतीं व कशीं तीं पहा.

डॉ. पेंडसे यांनीं आपल्या ग्रंथांत 'भाष्यकारातें (वाट) पुसतु' हें प्रकरण लिहितांना जी एक विशिष्ट आधुनिक पद्धति स्वीकारली आहे व जिची तारीफ श्री. रानडे यांनीं प्रस्तावनेंत केली आहे ती अशी कीं, गीतेच्या अठरा अध्यायांपैकीं प्रत्येक अध्यायांतून कांहीं श्लोक घेऊन त्या श्लोकांवरील शंकराचार्य व रामानुज ह्यांच्या भाष्यांची ज्ञानेश्वरींतील टीकेबरोबर तुलना केलेली आहे. अर्थात् त्यांनीं जे जे श्लोक घेतले आहेत त्यांपैकीं बहुतेक श्लोक ज्ञानेश्वरींतील ज्ञाननिष्ठा सिद्ध करून दाखविणें, ह्या अभिनिवेशानेंच घेतले आहेत. साहजिकपणें ह्या प्रकरणाच्या निष्कर्षांत त्यांना रामानुजांच्या अनुसरणाचें एकच स्थळ आढळलें आहे. बाकीचीं सर्व स्थळें अगदीं संशयित व गौण अशी त्यांना वाटतात. तथापि ६ स्थळीं श्रीज्ञानेश्वरमहाराज हे रामानुजांना अनुसरले आहेत असें त्यांना वाटतें; १४६ ठिकाणीं शंकराचार्यांप्रमाणें अर्थ केला आहे; ४२ ठिकाणीं शंकराचार्यांचेच शब्द वापरले आहेत. इत्यादि आंकडेवारीवरून डॉ. पेंडसे आपल्या ग्रंथांत म्हणतात कीं, या गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे 'भाष्यकारातें (वाट)पुसतु' यांतील 'भाष्यकार' शब्दानें ज्ञानेशांना एकच भाष्यकार अभिप्रेत आहेत व ते म्हणजे शंकराचार्य होत, असें या तुलनेवरून दिसेल. अशा ह्या डॉ. पेंडशांच्या सिद्धांताला आपल्या प्रस्तुत परीक्षणात्मक ग्रंथाचे लेखक, ह. भ. प. काळे हे संपूर्णतया दुजोरा देतांना पाहून वाचकांना आश्चर्य वाटल्यावांचून रहाणार नाहीं. त्यांच्या ग्रंथांतील पहिल्या 'विषय-प्रवेश' प्रकरणांत ते नेमकें हेंच विधान कसें करतात तें पहा. ते म्हणतात, "श्रीज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान" या ग्रंथांतील तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें रामानुजांच्या तत्त्वज्ञानाशीं ज्ञानेशांचें साम्य नाहीं, शांकर अद्वैत तत्त्वज्ञानाशीं ज्ञानेशांचें साम्य आहे; अज्ञानाच्या दृष्टीनें शंकराचार्य आणि ज्ञानेश्वर दोघेहि मायावाद मानितात, हें श्री. डॉ. शं दा. पेंडसे यांचें म्हणणें बरोबर आहे."

जो निष्कर्ष काढण्यासाठीं डॉ. पेंडसे यांना ‘ भाष्यकारातें ( वाट ) पुसतू ’ ह्या प्रकरणांत एवढा खटाटोप करावा लागला, तोच ज्ञानेशांचें रामानुजांशीं साम्य नाहीं असा अत्यंत विवादात्मक प्रश्न प्रस्तुत लेखकानें आपल्या ग्रंथांत अगदीं चुटकीसारखा सोडलेला आहे !

डॉ. पेंडसे यांच्या ‘ श्रीज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान ’ ह्या ग्रंथाचें खंडण करण्याच्या प्रतिज्ञेनें लिहिलेल्या ग्रंथांतील पहिल्या प्रकरणांतील हें विधान वाचून ह्या विधानाच्या द्वारें लेखकानें डॉ. पेंडसे यांना सरळ शरणचिठी लिहून दिली आहे असें कोणी म्हटल्यास वावगें होणार नाहीं. इतकेंच करून ते थांबले नाहींत तर हा वाद धसास लावण्यासाठीं लेखकांनीं ह. भ. प. श्री. राहिरकर यांच्याशींसुद्धां वाद घातला ! ‘ प्रेम–बोध ’ मासिकाचे संपादक श्री. राहिरकर हे भागवत संप्रदायांतील एक प्रेमळ, निष्ठावंत व बुद्धिमान् असे भक्त आहेत. त्यांच्या मतें ज्ञानेश्वरींतील ‘ भाष्यकारातें (वाट) पुसतू ’ ह्या ओवींतील चरणाच्या द्वारें ‘ भाष्यकारांतें ’ ह्या शब्दांत शंकर, रामानुज यांज बरोबर मध्वाचार्यांचासुद्धां समावेश अभिप्रेत असावा; परंतु प्रस्तुत ग्रंथाचे लेखक यांना तें मत मुळींच मान्य नसून डॉ. पेंडशांच्याप्रमाणें ‘भाष्यकारांतें’ ह्या शब्दानें ज्ञानेश्वरमहाराज हे ज्ञानेश्वरींत फक्त शंकराचार्यांनाच अनुसरले आहेत असा बेधडक निर्णय देतात, हें त्या ग्रंथांतील खालील अवतरणावरून दिसून येईल. ते म्हणतात, ‘ नंतर पुण्यामध्यें श्री. राहिरकर यांच्याशीं ज्ञा. १८–१७२२ या ओवींतील ‘ भाष्यकारातें ( वाट ) पुसतु ’ या मुद्दयासंबंधीं चर्चा करीत असतांना ते म्हणाले, येथील भाष्यकार मध्वाचार्यादि आचार्यहि घ्यावेत. माउलीच्या प्रेमभक्तीला शंकराचार्यांचें तत्त्वज्ञान पोषक नाहीं असें म्हणून त्यांनीं श्रीशंकराचर्यांवर टीका केली. आईनें ज्ञानेश्वरींत मध्वाचार्यादि आचार्यांना वाट पुसल्याचें दिसून येत नाहीं, पण अद्वैत तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें श्रीशंकराचार्यांना वाट पुसल्याचें स्पष्टपणें दिसून येतें; म्हणून श्री. राहिरकरांचें म्हणणें बरोबर वाटलें नाहीं. ते निष्ठावंत वारकरी आहेत. त्यांची विठ्ठल–भक्ति पाहून मनास आनंद वाटला.’ या वरील विधानावरून लेखकांची अद्वैतवादावरील निष्ठा अव्यभिचारी आहे हें उघड आहे !

येथपर्यंतच्या विवेचनावरून डॉ. पेंडसे यांच्या ‘ श्रीज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान ’ ह्या ग्रंथाचें खंडण करण्याच्याच केवळ संकल्पानें ज्यांनीं ‘ ज्ञानेश्वरमाउलीची ज्ञानोत्तर प्रेमभक्ति ’ हा ग्रंथ लिहिला, ते ग्रंथकार आपल्या ग्रंथाचें उद्दिष्ट अजीबाद विसरून जाऊन वादाच्या भरांत डॉ. पेंडशांच्या मताशीं पूर्ण सहमत कसें झाले आहेत आणि ह्या सहमताच्या द्वारें आपण ज्यांच्याशीं वाद करावयाचा संकल्प केला त्यांना पहिल्याच पवित्र्यांत आपण कशी शरणचिठी देत आहोंत, हें दृश्य म्हणजे त्यांच्या ग्रंथांतील एक मोठें वैगुण्य आहे असें आम्हीं कां म्हणतों ह्याची साक्ष रसिक आणि मार्मिक वाचकांस सहज पटेल.

प्रस्तुत ग्रंथांतील मुख्य वैगुण्याचा विचार केल्यानंतर त्यांतील गुणावगुणांचा विचार करणें जरूर आहे. ह्या दृष्टीनें पहिलें प्रकरण जर वाचलें तर वाचकांस असें आढळून येईल कीं वादाचा मुख्य मुद्दा सोडून इतर गौण मुद्दयांना त्यांनीं प्राधान्य दिलेलें

दिसतें. उदाहरणार्थ, पहिल्या प्रकरणांत श्री. भाळुंकर आणि श्री. वाळिंबे यांच्याशीं कांहीं गौण मुद्द्यांवर चर्चा केली आहे. श्री. भाळुंकरांचीं कांहीं विधानें अशीं आहेत कीं 'तीर्थावळींत नामदेव कुवाचा प्रसंग घडून आल्यावर ज्ञानी व योगी ज्ञानेश्वरमहाराज वारकरी सांप्रदायी विठ्ठलभक्त झाले.' तसेंच 'नाथपंथाचा स्वीकार केल्यानंतर ज्ञानेशांनीं ज्ञानेश्वरी ग्रंथांत भागवत धर्माची शिकवण दिली नाहीं, नाथपंथाची शिकवण दिली आहे; विसोबा खेचराकडून नाथपंथाचा स्वीकार केल्यानंतर अभंगांत नामदेवरायांनीं नाथपंथाची शिकवण दिली नाहीं, भागवत धर्माची शिकवण दिली आहे.' त्याचप्रमाणें 'श्रीज्ञानेश्वरींत कोठेंहि श्री विठ्ठलभक्तीचा उल्लेख नाहीं.' आणि 'श्रीनामदेव-महाराजांचे भक्तिप्रेमाचे अनुभवजन्य बोल ऐकून व कूपाचा चमत्कार पाहून ज्ञानी ज्ञानदेव तेव्हांपासून भक्तहि झाले व श्रीविठ्ठलाचें नामसंकीर्तन करूं लागले. ह्या सर्व विधानांचे आपल्या ग्रंथांत लेखकानें खंडण केलें आहे. श्री. वाळिंबे ह्यांनीं 'ज्ञानेश्वरचरित्र' व 'ज्ञानेश्वरी चर्चा' ह्या आपल्या ग्रंथांत 'तीर्थयात्रा सुरू होण्यापूर्वीं ज्ञानदेवानें अभंगरचना केली नसेलच असें म्हणतां येत नसलें तरी तीर्थयात्रोत्तर काळांत तशी स्फुट रचना अधिक झाली असावी. नऊ हजार ओव्यांच्या ज्ञानेश्वरींत चुकूनहि विठ्ठलाचें नांव न घेणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या अभंगांतील बराच मोठा हिस्सा पंढरीच्या पांडुरंगाच्या आळवणीस वाहिलेला आहे...कारणें कोणतींहि असलीं तरी यात्रेमुळें झालेले परिणाम फार महत्त्वाचे आहेत. वारकरी सांप्रदायाचा त्यावेळचा पुढारी नामदेव होय.' ह्या अशा गौण विधानांचा सुद्धां ग्रंथकर्त्यांनीं परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत ग्रंथाचा उद्देश ज्ञानेश्वरींत शंकराचार्यांप्रमाणें ज्ञाननिष्ठा आहे कीं लेखकाच्या म्हणण्याप्रमाणें प्रेमलक्षणा भक्ति आहे हा मुख्य वाद होय. अर्थात् पहिल्याच प्रकरणांत मुख्य वादाचा प्रश्न बाजूला ठेवून इतर गौणवाद घेणें हें विवेचनाच्या दृष्टीनें श्रेयस्कर नाहीं. नामदेव कुवाचा वाद अत्यंत मनोरंजक व उद्बोधक आहे. ह्या वादाला अनेक दृष्टींनें उत्तरें देण्यासारखीं आहेत. ह्या वादांत श्री. भाळुंकरांचें म्हणणें खरें मानलें किंवा श्री. वाळिंबे ह्यांचें म्हणणें खरें मानलें अथवा तद्विरुद्ध प्रस्तुत लेखकांचीं विधानें खरीं मानिलीं तरी त्यामुळें ज्ञानेश्वरींत ज्ञाननिष्ठा आहे कीं प्रेमलक्षणा भक्ति आहे ह्या मुख्य प्रश्नास तें मुळींच पोषक नाहीं. हे जे लेखकानें आपल्या पहिल्या प्रकरणांत गौण वाद उपस्थित केले आहेत त्या वादांत ज्ञानेश्वरकालीन धार्मिक, ऐतिहासिक आणि सामाजिक परिस्थितीचा अभ्यास आवश्यक असल्यामुळें लेखकांनीं वास्तविक ज्ञानेश्वरांचें चरित्रात्मक असें एक स्वतंत्र प्रकरण जोडून सविस्तर आणि सावकाशपणें त्याचा विचार करणें जरूर होतें. अशा विचारांच्या अभावीं वरील वादापासून लेखकांच्या मुख्य उद्दिष्टाला हे गौण वाद कांहींच साह्यभूत झालेले नाहींत हें विवेचनाच्या दृष्टीनें दोषार्ह आहे.

ज्ञानेश्वरींत ज्ञाननिष्ठा आहे कीं प्रेमभक्ति आहे हा वाद सोडविण्यास एक विलक्षण दंडक लेखकानें घातला आहे. तो लेखकांच्या मताप्रमाणें असा आहे कीं, ज्ञानेश्वरींत ज्ञाननिष्ठा आहे कीं प्रेमलक्षणा भक्ति आहे ह्या वादांत श्री. गुलाबराव महाराज आणि इतर भागवत संत ह्यांचीं वचनें श्रुतिवाक्याप्रमाणें प्रमाणभूत मानावींत

लेखकांनीं सुद्धां ह्या दंडकाप्रमाणें आपल्या ग्रंथांत सर्व वादांचें विवरण केलें आहे. परंतु प्रतिपक्षीयांस हा दंडक बंधनकारक नाहीं ही गोष्ट ते विसरले. भक्तिमार्गीयांना जशीं गुलाबरावादि संतांचीं वचनें प्रमाणभूत आहेत तशींच किंबहुना त्यांच्यापेक्षां तीव्रतर भावनेनें ज्ञानमार्गी लोकांना श्रीमच्छंकराचार्य, श्रीमधुसूदनसरस्वती किंवा अलिकडील, 'विचारसागर'कर्ते, श्रीनिश्चलदासजी, ह्यांचीं वचनें प्रमाणभूत आहेत. विशेषतः सन्यासमार्गी साधकांना तर श्रीनिश्चलदासांचा ग्रंथ शिरोधार्य आहे. तेव्हां उपरिनिर्दिष्ट अशा विचित्र दंडकाच्या जोरावर स्वमतसमर्थन करण्याचा प्रयत्न करणें अशास्त्रीय आहे. अर्थात ज्यांना समन्वय करावयाचा आहे त्यांना कोणत्याच दंडकाची जरूरी नाहीं. पण प्रस्तुत लेखकांप्रमाणें जे उघड उघड वादास उभे राहिले आहेत त्यांना अशा प्रकारचा दंडक प्रतिपक्षीयांवर लादण्याचा मुळींच अधिकार नाहीं. साधक ज्या संप्रदायाचा असेल त्याच्या सांप्रदायिक निष्ठेवर आक्रमण करून वाद लढविणें ही पद्धत अत्यंत अनुचित व विचित्र आहे. प्रस्तुत लेखकांनीं आपल्या ग्रंथांत ह्या पद्धतीचा मनसोक्त उपयोग केलेला आहे. अशा प्रकारचीं कांहीं उदाहरणें आम्ही वाचकांसमोर मांडतो. म्हणजे ह्या बाबतींत त्यांची खात्री होईल. पहिल्याच प्रकरणांत [ पृ.३ ] ग्रंथकार म्हणतात, ' माउलीच्या वचनांच्या अर्थांविषयीं विद्वानाविद्वानांमध्यें मतभेद झाले असतां स्वानुभवी संतांनीं केलेले अर्थ स्वीकारणें अधिक श्रेयस्कर असतें.' तसेंच ' संत आणि नामापराध ' ह्या प्रकरणांत [ पृ. १३९ ] ते म्हणतात, ' वेदशास्त्र, वेदांत ग्रंथ यांचा अभ्यास करणारे लोक वेदशास्त्राचा अभिमान घेऊन श्रीहरीच्या रूपास व नामास भौतिक मानून निरपराध नामालाहि गौण स्थान देत असतात. संतांच्या मतांहून त्यांचें मत निराळें असल्यामुळें संतांच्या भक्तांनीं त्यांच्या अशा मतांना खरें मानूं नये.' त्याचप्रमाणें ' चौथा पुरुषार्थ, पांचवा पुरुषार्थ ' ह्या प्रकरणांत ते म्हणतात, ' चहूं पुरुषार्थां शिरीं असलेल्या भक्तीचा अर्थ ज्ञानलक्षणा भक्ति घ्यावा असें कांहीं विद्वान म्हणतात, कांहीं विद्वान ह्या भक्तीचा अर्थ प्रेमलक्षणा भक्ति घेतात. आम्हाला संतांनीं केलेला अर्थ ज्ञानेशांना अभिप्रेत आहे असें वाटतें.' तसेंच पृ.२१०वर म्हणतात 'एकाच ओंवीचा विद्वान् लोक कसा वेगवेगळा अर्थ करतात तें यावरून दिसून येईल. विद्वानांमध्यें मतभेद असल्यास स्वानुभवी संतांचें मत प्रमाण मानणें श्रेयस्कर असतें असें माझ्या अल्प बुद्धीला वाटतें.' संतांवर ज्यांची इतकी अढळ श्रद्धा आहे अशा लेखकांनीं आपल्या ग्रंथांत श्रीनिश्चलदासजी, श्रीमधुसूदनसरस्वती ह्या केवलाद्वैतवादी तत्त्वज्ञांबरोबर आणि विशेषतः ज्ञानेश्वरींत सर्वत्र ज्ञाननिष्ठाच आहे असें प्रतिपादन करणारे डॉ. पेंडसे ह्यांच्याबरोबर वाद करण्याच्या भरीस कां पडावें ह्याचेंच आम्हांस आश्चर्य वाटतें. विद्वानाविद्वानांमध्यें वाद पडल्यास साधकांनीं किंवा भक्तांनीं कोणता मार्ग स्वीकारावा, परमार्थ विषय हा किती गहन आहे, शुष्क वादानें पारमार्थिक प्रमेयें सोडविण्याचा अट्टाहास परमार्थांत किती हानिकारक आहे, ह्या सर्व प्रश्नांस उत्तर म्हणून प्रत्यक्ष श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं ज्ञानेश्वरींत भक्तांस अत्यंत सूचक असें इषारे दिलेआहेत. ९ व्या अध्यायांत श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात

एथ जाणीव करी तोचि नेणें । आथिलेपणें मिरवी हेंचि उणें ।
आम्ही जालों ऐसें जो म्हणें । तो कहींचि नव्हे ॥ ३६८ ॥
म्हणौनि थोरपणा पऱ्हां सांडिजे । व्युत्पत्ति आघवी विसरिजे ।
जैं जगा धाकुटें होइजे । तैं जवळीक माझी ॥ ३७८ ॥

म्हणून विद्वानाविद्वानांमध्यें मतभेद झाल्यास काय करावें असा भक्तांस प्रश्न पडल्यास त्यांनीं वरील ओव्यांत सांगितल्याप्रमाणें वागावें हें सर्वस्वीं श्रेयस्कर होय. कारण ज्ञानेश्वरमहाराजांच्या मताप्रमाणें 'आत्मप्रभा ही नित्य नवी । हीच करूनि ठाणदिवी । जो इंद्रियांते चोरूनि सेवी । तयासीची फावे ॥' ह्या ओवीच्या द्वारें भक्तांना वाद-विवादापासून दूर रहा हा संदेश दिला आहे. आणि आजच्या ह्या विसाव्या शतकांत स्वामी रामकृष्णपरमहंस व शिरडीचे श्रीसाईबाबा ह्यांनीं हाच उपदेश भक्तांना वेळोवेळीं केला आहे. ह्या वरील ओव्यांप्रमाणें लेखकांनीं आपल्या ग्रंथांत वापरलेली विवादात्मक पद्धति सोडून देऊन सुप्रसिद्ध पांगारकरादि लेखकाप्रमाणें समन्वयाच्या पद्धतीनें आपलें ग्रंथलेखन केलें असतें तर तें भक्तांना आनंदप्रद व कल्याणकारक झालें असतें.

अशा तऱ्हेचा सुंदर समन्वय श्रीमच्छंकराचार्यांचे नैष्ठिक शिष्य सुप्रसिद्ध श्री. बापटशास्त्री यांनीं आपल्या 'तत्त्वानुसंधानसार' ह्या ग्रंथांत 'पांच पक्ष व त्यांचें ग्राह्याग्राह्यत्व' ह्या परिच्छेदांत केलेला आहे. श्री. बापटशास्त्री म्हणतात, 'तात्पर्य, मुमुक्षूच्या मनास जो पक्ष बरा वाटेल त्याचा त्यानें ब्रह्मसाक्षात्काराकरितां स्वीकार करावा. कारण इष्ट वस्तूच्या प्राप्तीकडे लक्ष्य देऊन, खंडनामंडनाच्या भानगडींत न पडतां, सोयीवार वाटेल तो पक्ष धरणें व प्रत्यगात्म्याची ओळख करून घेऊन तेंच ब्रह्म आहे, असा साक्षात्कार करून घेणें यांतच पुरुषार्थ आहे.'

लेखकांचा आध्यात्मिक अभ्यास दांडगा आहे. ते व्युत्पन्न आहेत. पण ह्या गुणांवर त्यांच्या विवादात्मक पद्धतीनें पाणी पडलें आहे, असें खेदानें म्हणावें लागतें. श्रीमच्छंकराचार्यांच्या केवलाद्वैतवादाची विलक्षण पकड लेखकांच्या मनावर बसलेली दिसते. ती इतकी कीं त्यामुळें आपण आपल्या ग्रंथांत परस्परविरोधी अशीं विधानें करीत आहोंत ह्याची सुद्धां त्यांना दाद नाहीं! ह्याचा मजेदार नमुना त्यांच्या ग्रंथांत पृ. ७३ वर सांपडतो. ते म्हणतात 'गीता हें ज्ञानप्रधान शास्त्र आहे. त्या योगानें मोक्ष मिळविणें हें फळ आहे. अविद्यानाश व मोक्षप्राप्ती या दोहोंस साधन केवळ ज्ञान आहे, असें माउलीनें म्हटलें आहे.' गीतेचा ज्ञानेश्वरमाउलीच्या मताप्रमाणें इतका बिनचूक निष्कर्ष काढूनहि ते आपल्या ग्रंथाच्या उपसंहारांत ही गोष्ट अजिबात विसलेले दिसतात. आपल्या ग्रंथाच्या उपसंहारांत (पृ. ४८७) ते म्हणतात, 'गीतेचा विषय भक्ति आहे. तो कल्प्य आहे किंवा सत्य आहे असा संशय दूर करण्याकरितां त्याच अध्यायाच्या पांचव्या श्लोकांत निर्गुणोपासकांना दुःखनिरूपण केलें आहे. म्हणून द्वितीयपरिचायक अन्यथानिषिद्धद्वारा गीतेंत भक्ति हा विषय कल्प्य नसून सत्य आहे असें सिद्ध होतें.' ह्यावर मग गीतेंतील ज्ञानपर श्लोकांचें

प्रयोजन काय असा प्रश्न त्यांना विचारला तर, त्याचें उत्तर ते श्लोक सर्व ‘ सहाय्यपर ’ म्हणून गणले जावे असें ते देतात ! मग गीता हें ज्ञानप्रधान शास्त्र आहे ह्या म्हणण्याचा अर्थ काय ?

ह्या ग्रंथांत पुष्कळसें सोनें आहे आणि पुष्कळशीं रत्नें आहेत. परंतु प्रमादास्पद विवेचनाच्या आवरणामुळें त्या सर्वांचें तेज मंद झालें आहे. सुसंगत विवरण आणि संकलनपद्धति असती तर ह्याच ग्रंथांत एक तेजस्वी रत्नहार वाचकांना दिसून आला असतां. ह्या ग्रंथांतील बहुतेक सारीं प्रकरणें भागवतधर्मसंप्रदायानुसार असल्यामुळें डॉ. पेंडशांसारख्या ज्ञानवादी लोकांना तीं मुळींच पटण्यासारखीं नाहींत. आमच्या मतें एवढें मोठें शब्दावडंबर माजविण्यापेक्षां ‘ भाष्यकारांतें (वाट) पुसतु ’ ह्या डॉ.पेंडशांच्या प्रबंधांतील प्रकरणाचा डॉ. पेंडशांचेंच तंत्र वापरून जर परामर्श घेतला असतां तर ग्रंथाचें मुख्य उद्दिष्ट साध्य झालें असतें.

सोप्या, सुगम व साध्या भाषेंत पारमार्थिक तत्त्वें विशद करणें ह्या बाबतींत अध्यात्मिक ग्रंथकार विशेष दक्षता घेत असतात. पारिभाषिक शास्त्रीय शब्द टाळून किंवा ते अपरिहार्यच असले तर त्यांचें साध्या व सोप्या भाषेंत स्पष्टीकरण करणें वाचकांच्या दृष्टीनें जरूर असतें. ह्या गोष्टीकडे व्युत्पत्तीच्या भरांत लेखकांचें बरेंच दुर्लक्ष झालेलें आहे. उदाहरणार्थ त्यांच्या ग्रंथांतील पृ. ५४ वरील पुढील वाक्य पहाः–‘उपासनेचा विषय मायासंवलित सविशेषब्रम्ह आहे आणि भक्तीचा विषय मायावच्छेदसंवलित सविशेषब्रह्म आहे. मायावच्छेदावछिन्न चैतन्य विग्रहवान हें आमच्या मधुराद्वैतांतील ध्येय होय.’ ह्या वाक्यांत नैय्यायिकांची परिभाषा असून सामान्य वाचकांस अर्थातच ती दुर्बोध व अगम्य आहे. ह्यासाठीं सामान्य वाचकांकरितां ह्या वाक्यांतील अर्थ सोप्या व सरळ भाषेंत देणें अवश्य होतें. अशा तऱ्हेचीं अनेक अवजड वाक्यें असल्यामुळें ग्रंथांत ठिकठिकाणीं आलेली दुर्बोधता वाचकांचा रसभंग करते. ज्ञानेश्वरींतील ‘ चहु पुरुषार्थांच्या शिरीं ’ ह्या चरणांत श्रीज्ञानेश्वरांना भागवतांचा पंचम पुरुषार्थच अभिप्रेत आहे. ज्ञानेश्वरांना कुलपरंपरेनें विठ्ठलभक्ति प्राप्त झाली होती; ज्ञानोत्तरसुद्धां ज्ञानेशांना सगुण विठ्ठलाची प्रेमभक्ति मान्य होती, हेंच वाद पुनरुक्तीनें लेखकांनीं आपल्या ग्रंथांत पाल्हाळानें चर्चिले आहेत.

‘ वामनपंडित व ज्ञानेश्वरमहाराज ’ ह्या विषयावर लेखकांनी डॉ. पेंडसे यांच्याबरोबर जो वाद घातला आहे त्यांत लेखक म्हणतात कीं ‘ अवजानन्ति मां मूढा ’ ह्या श्लोकावरील ज्ञानेशांच्या भाष्यामुळें वामनपंडितांस मुळींच चीड आली नाहीं वस्तुस्थिती उलट आहे. वामन पंडित चिडले, इतकेंच नव्हें तर ‘ गीता जाते पूर्वेकडे । टीका चढे पश्चिम पर्वताचे कडे. असा टीकेचा कडाका ज्ञानेश्वरांविरुद्ध त्यांनी उडवून दिला. ह्या दृष्टीनें डॉ. पेंडसे यांचे मत सयुक्तिक आहे हें कोणासही कबूल करावें लागेल. गीतेंतील बाराव्या अध्यायांतील पहिल्या श्लोकांतील ‘ त्वां ’ ह्या पदावर प्रस्तुत लेखकांनी जें केशपिंजण ( Hair-splitting ) केलें आहे त्यांत अर्थवादापलीकडे जास्त तथ्यांश नाहीं. नाही म्हणावयास ‘ व्यतिरेकज्ञानी, ज्ञानीभक्त जग असिकी-

वस्तुप्रभा ' हें प्रकरण लेखकांनी संयमपूर्वक लिहिलें असल्यामुळें वाचनीय व अपवादात्मक असें झालें आहे. एकंदरींत ग्रंथकर्त्याच्या ग्रंथांतील विषयांची रूपरेखा ही अशी आहे.

वस्तुतः ज्ञानेश्वरी हें धार्मिक व भाषिक लोकशाहीचें ६०० वर्षापूर्वीचें महाष्ट्राचें क्रांतिकाव्य आहे. अशा काव्याची केवळ शास्त्रिय अध्यात्मिक ग्रंथाबरोबर तुलना करणें ही पद्धति सदोष आहे. शास्त्रांत इंद्रियांना गोचर व बुद्धीला गम्य इतक्यांच तत्त्वप्रमेयांची छाननी होऊं शकते. परंतु काव्यांत बुद्धीला व तर्काला अगम्य व इंद्रियातीत अशा परस्परविरोधी प्रमेयांच्या एकवटलेल्या व समन्वित प्रतिमेचा कविच्या प्रतिभेला साक्षात्कार होतो. ' हिरण्यमयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखं ' असें चिन्मय सत्य फक्त कवीच्या उदात्त प्रतिभेलाच दिसू शकते. ह्याचा अनुभव ज्ञानेश्वरीच्या मार्मिक व रसिक वाचकांना भरपूर येतो. उदाहरणार्थ, गीतेच्या ६ व्या अध्यांतील ' योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थितः ' ह्या १० व्या श्लोकावरील टीका हे अध्यात्मांतील एक उदात्त असें काव्य आहे. हें ज्ञानेश्वरींतील ह्या श्लोकाच्या भाष्यावरून दिसून येतें. ते असें.

विपाये अहंभाव यमाचा जाईल । मी तेंचि हा जरी होईल ।
तरी मग काय कीजेल । एकलेया ॥ ११६ ॥
दिठीच पाहतां निविजे । कां तोंड भरोनि बोलिजे ।
नातरी दाटूनी खेंव दीजे । ऐसें कवण आहे ॥ ११७ ॥
आपुलिया मना बरवी । असमाई गोठी जीवीं ।
ते कवणेंसी चावळावी । जरी ऐक्य जाहलें ॥ ११८ ॥
इया काकुळती जनार्दनें । अन्योपदेशाचेनि हातारानें ।
बोलामाजिं मन मनें । आलिंगू सरलें ॥ ११९ ॥

येथें ज्ञानेश्वरांना शंका आली कीं गीतेच्या श्लोकांवरील पदपदार्थ टीका वाचणाऱ्या व करणाऱ्या पंडितांना हें काव्य वाचून मूळ श्लोकास सोडून ज्ञानेश्वर महाराज भलतीकडे कोठें वहावत गेले अशी शंका येईल. ह्याची श्रीज्ञानेशांना जाणीव होतीच म्हणून लगेच ते पुढें म्हणतात.

हें परिसतां जरी कानडें । तरी जाण पां पार्थ उघडें ।
कृष्ण सुखाचेचि रूपडे । वोतले गा ॥ १२० ॥

आतां ह्याच्या पुढील उपमा किती बहारीची आहे तें पहा. ते म्हणतात,

हें असो वयसेचिये शेवटीं । जैसे एकचि विये वांझोटी ।
मग ते मोहाची त्रिपुटी । नाचों लागे ॥ १२१ ॥
तैसे जाहले श्रीअनंता । ऐसे तरी मी न म्हणतां ।
जरी तयाचा न देखता । अतिशयो एथ ॥ १२२ ॥

गीतेंतील मूळ श्लोकाच्या पदपदार्थांत ह्या श्रीज्ञानेश्वरांनी वर्णन केलेल्या भगवंत **आणि** भक्त ह्यांच्या रमणीय व रोमहर्षकारी चित्राचा थांगपत्तादेखील नाहीं. हें केवळ **ज्ञानेश्वरांच्या**

काव्य प्रतिभेनें पाहिलेलें देवभक्ताच्या प्रेमाचें विलोभनीय असें दृश्य आहे. श्रीज्ञानेश्वर महाराज एथेंच थांबलें नाहींत. ते पुढें म्हणतात.

पाहा पां नवल कैचें चोज। कॆं उपदेश केउतें झुंज।
परी पुढें बालभाचें भोज। नाचत असे ॥ १२३ ॥

ह्याच्या पुढील ओवींत तर शेक्सपियरनें आपल्या 'मिडसमर नाईट्स ड्रीम' ह्या नाटकांत जी बहारीची प्रेमसृष्टि निर्माण करून 'The lunatic, the lover and the poet are of imagintlion all compact' असे उद्गार काढले आहेत. त्याचप्रमाणें श्री ज्ञानेश्वरांनी ह्या देवभक्ताच्या प्रेमाची सृष्टि रंगावितांना नेमके त्याच थाटाचे उद्गार काढिले आहेत. हें खालील ओंवीवरून मार्मिक व रसिक वाचकांस दिसून येईल.

आवडी आणि लाजवी। व्यसन आणि शिणवी।
पिसे आणि न भुलवी। तरी तेंचि काई ॥ १२४ ॥

अशा तऱ्हेची केवळ काव्यमय उदाहरणें ज्ञानेश्वरींत अनेक आहेत. खुद्द ज्ञानेश्वरमहाराजांनीं अभिमानपूर्वक म्हटलें आहे कीं माझी ज्ञानेश्वरी हें काव्याचें निवासस्थान आहे.

तैसेनि आइतेपणें। कवित्वा जालें हें उपेणें।
मनन निदिध्यास श्रवणें। जिंतिलें आतां ॥ अ. १८ ओं. १७४६

ह्या वरील ओंवीतील उद्घोषावरून ज्ञानेश्वरी हा केवळ शास्त्रीय ग्रंथ नसून एक काव्य सुद्धां आहे ह्याची वाचकांना साक्ष पटेल. म्हणून अशा क्रांतिकाव्याची तुलना शास्त्रीय ग्रंथाबरोबर करणें प्रमादास्पद आहे. ज्ञानेश्वरीचें मर्मज्ञतेनें व रसज्ञतेनें वाचन केलें तर ज्ञानेश्वरींत अद्वैत आहे कीं भक्ति आहे असे पंडितांना भेडसावणारे विरोधात्मक प्रश्न चिदानंदांत साफ विरून जातात.

आमच्या मतें पंडित पांडुरंग शर्मा, डॉ. पेंडसे आणि प्रस्तुक ग्रंथाचे लेखक श्री. काळे ह्यांनीं अंगिकारलेली, ज्ञानेश्वरीची इतर गीतेच्या भाष्यांबरोबर तुलना करून निश्चित निर्णय घेण्याची पद्धति सर्वस्वी एकांगी व अपरिपूर्ण आहे. त्याचप्रमाणें ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव ह्या श्रीज्ञानेश्वरांच्याच दोन ग्रथांतील अध्यात्मिक तुलनात्मक एकवाक्यता दाखविण्याचा प्रयत्नही तितकाच निष्फळ आहे, हें ओघानेंच सिद्ध होतें. ज्ञानेश्वरी हें काव्य ज्ञानेशांच्या व तत्कालीन महाराष्ट्राच्या दैनंदिन धार्मिक जीवनकलहांतून चौफाळून वर आलेले आहे. ह्या दृष्टीनें विचार केला तर ज्ञानेश्वरी हा जिवंत ग्रंथ असून अमृतानुभव हा शीतपेटिकेंतील ग्रंथ आहे, हे रसिक व मर्मज्ञ वाचकांस कळून येईल. अशा परिस्थितींत ज्ञानेश्वरकालीन ऐतिहासिक, धार्मिक व सामाजिक परिस्थितीचा विचार व त्या बरोबरच खुद्द श्री ज्ञानेश्वरमहाराजांचा जीवनकलह ह्या सर्व गोष्टीचा विचार केला तर ज्ञानेश्वरीचा उद्गम अत्यंत क्रांतिकारक वातावरणांत झाला हें ऐतिहासिक सत्य दृष्टीआड करून चालणार नाहीं. म्हणजे जवळ जवळ ज्ञानेश्वरांचें अंतःकरण तेंच ज्ञानेश्वरीचें अंतःकरण

हें कबूल करणें भाग आहे. ह्या दृष्टीनें पंडित पांडुरंग शर्मा, डॉ. पेंडसे किंवा प्रस्तुत ग्रंथकार श्री. काळे यांनीं जी विवादात्मक पद्धती अवलंबिली आहे त्या पद्धतींत अर्थवाद किंवा वितंडवाद असेल, परंतु वास्तववाद नाहीं हें उघड दिसतें. म्हणून ही पद्धति एकांगी व सदोष आहे अशातऱ्हेचे विचार श्री. काळे यांचा प्रस्तुत ग्रंथ वाचतांना पुढें उभे रहातात.

'पंचम पुरुषार्थ' ही भाषा खास भागवत संप्रदायाची आहे. ही गीतेची भाषा नाहीं. म्हणून ह्या शब्दाचा ज्ञानेश्वरींत मागमूस सांपडत नाहीं. ज्ञानेश्वरींत, सांख्य, शैव आणि वैष्णव ह्या सर्व संप्रदायांचा समन्वय आहे. म्हणूनच १८ व्या अध्ययांत

ज्ञानी इयेतें स्वसंवित्ति। शैव म्हणती शक्ति।
आम्ही परमभक्ति। आपुली म्हणो॥

असा समन्वय ज्ञानेश्वरमहाराजांनी केला आहे. भिन्न भिन्न संप्रदायांच्या द्वेषाने एकमेकांचा कपाळमोक्ष करणाऱ्या आततायी लोकांना वरील ओंवींच्या द्वारें ज्ञानेश्वरींत शैव काय, वैष्णव काय सर्व एक आहेत, निष्कारण भांडण करूं नका हा ऐतिहासिक संदेशच श्रीज्ञानेशांनीं लोकांस दिला आहे. ह्याचाच अनुवाद एकनाथमहाराज ह्यानीं आपल्या भागवतांत दिला आहे. खुद्द प्रस्तुत लेखकांनी ह्या ओंवीवर केलेलें भाष्य अवास्तव आहे असें म्हणावें लागतें. आंगठ्याचे ठसे जसे प्रत्येक माणसाचे भिन्न असतात तसें प्रत्येकाचे भक्तीचे अनुभव वेगवेगळे असतात. परमार्थांत ज्याचा अनुभव त्याला, असा नियम आहे. दुसऱ्याचें ऐकून किंवा अनुकरण करून फसूं नका. म्हणूनच

पाणियाहूनि बरवे। तूपीं गुण कीर आहे।
परी काय रहाणें होये। मीना तेथें॥

ह्या वरील ओंवींतील सुभाषिताच्या द्वारें ज्ञानेशानी साधकासबोध केला आहे. एवढ्याचकरितां साधकाची दिशाभूल होईल किंवा मस्तक भणाणून जाईल अशी लेखनपद्धति टाळण्याची दक्षता ठेविली पाहिजे. ज्ञानेश्वरींत ही आपत्ति श्रीज्ञानेश्वर महाराजांनी मुद्दाम टाळिली आहे, हें ज्ञानेश्वरीच्या अभ्यासूंना कबूल करावें लागेल.

शेवटीं समन्वयाच्या दृष्टीनें ह्या ग्रंथांत साधकांना उपयोगी व हितोपदेशी अशा बऱ्याच गोष्टी आहेत हें आम्ही आरंभीच सांगितलेलें आहे. म्हणून आमची अशी प्रार्थना आहे कीं या ग्रंथास दुसऱ्या आवृत्तीचा सुयोग लवकरच येवो, व त्याचप्रमाणे पुर्नमुद्रणाच्या वेळीं उपरिनिर्दिष्ट दोषस्थळे सुधारलीं जावोत.

## शिरडी येथें यंदा साजरा झालेला

# ★ श्रीरामनवमी महोत्सव ★

### ( आमच्या प्रतिनिधीकडून )

ता. १० एप्रिल ते ता. १२ एप्रिलपर्यंत तीन दिवस प्रतिवर्षाप्रमाणें यंदाहि श्रीरामनवमी महोत्सव शिरडीस मोठ्या थाटामाटानें आणि उत्साहानें साजरा झाला.

पहिल्या दिवशीं पहांटेस शिर्डी येथील गांवकरी मंडळी व परस्थळांचे भक्तगण यांनी कोपरगांवाहून 'गंगा-गोदावरी'च्या लहानमोठ्या भरलेल्या कावडी वाजत-गाजत भजन करीत मोठ्या जमावांत श्रीसाईनामाचा गजर करीत मिरवणुकीनें शिर्डीस आणून त्याचें ( गंगा-गोदावरीचें ) भक्तिभावें पूजन करून त्या २५०-३०० गंगोदकानें भरलेल्या कावडी श्रींचे समाधीवर समर्पण करण्यांत आल्या.

श्रींचे मंगल-स्नानाचा विधि दही-दूध-पंचामृत-अत्तर-गुलाब-वगैरे सुगंधित द्रव्यानें शास्त्रोक्त धार्मिक विधानुसार झाला. मौल्यवान वस्त्रें, व गलेफ, यांनी श्रींची समाधि आच्छादित करून त्यावर सुगंधी पुष्पें-हार फुलांचे शेरे वाहून श्रींची समाधि भरगच्च भरून टाकण्यांत आली होती.

त्या वेळीं तो प्रसंग पाहणारांस असेंच भासत होतें कीं, जणूं प्रत्यक्ष बाबाच विराजमान झाले आहेत.

चित्तास परम संतोष व आनंद देणारा तो देखावा पाहून प्रेमळ व भाविक भक्तांचीं अंतःकरणें हर्षानें उचंबळून येत होतीं.

दिवसभर श्रींचे समाधि-मंदिरांत व बाहेर अनेक वेगवेगळे कार्यक्रम चालूच होते. ( गायन वादन वगैरे ) प्रत्येक कार्यक्रमांत अलोट गर्दी होती.

ता. ११ ला नियमाप्रमाणें पहांटेची श्रींची काकड आरती, नंतर प्रातःस्नान, तदनंतर भक्तगणांचें पूजन, अर्चन, अभिषेक, नैवेद्य इत्यादि विधि झाले. श्रीचरणीं वस्त्रें, गलेफ इत्यादि वस्तू अर्पण करण्यांत येत होत्या.

पुण्याचे प्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. पं. अनंत दामोदर आठवले यांचें श्रींचेपुढें समाधि-मंदिरांत कीर्तन झालें.

दुपारची श्रींची आरती, नैवेद्य होऊन प्रसाद वांटण्यांत आला.

तिसरे प्रहरानंतर श्रींचे निशाणाची व रथाची मिरवणूक रथ शृंगारून निघाली होती. मोठ्या थाटानें बॅन्ड, तासे, ढोल, लेजीम वगैरे अनेक वाद्यांचे गजरांत, एकसारखा श्रीनामाचा जयघोष करीत श्रींचे रथाची मिरवणूक निघाली होती.

दोन प्रहरीं ४ ते ६ पावेतो 'श्रीं'ना अर्पण झालेलें कापड-वस्त्रें व कांहीं वस्तू, या श्रींचे प्रासादिक वस्तूंची विक्री करण्यांत आली.

रात्रीं शोभेचें दारूकाम, उंच आकाशांत जाऊन उडणारें रंगी बेरंगी प्रकारचें उत्तम दारूकाम उडविणेचा कार्यक्रम जवळजवळ तासभर चालू होता.

दारूकामाची शोभा फारच चांगली झाली. त्यापुढें सबंध रात्र भर जागर करण्यांत आला.

मुंबईचे नाट्य कला मंडळीनें 'खरा ब्राह्मण' या नाटकाचा प्रयोग उत्तम प्रकारें केला.

या उत्सवानिमित्त परगांवहून अनेक कलावंत, विद्वान्, पंडित, शास्त्री इत्यादि मंडळी आली होती. कोणी प्रवचन करून, कोणी नृत्य करून, कोणी गायन करून श्रींच्या दरबारीं हजेरी दिली. भजनी मंडळांचीं भजनें झालीं. नाटकांचे प्रयोग झाले.

ता. १२ रोजीं गोपालकाला, दहीं-हंडी हा कार्यक्रम होऊन सर्वांना प्रसाद वांटण्यांत आला.

रात्रीं मुंबईच्या 'दत्त कला मंडळा' नें संत 'कान्होपात्रा' या नाटकाचा सुंदर प्रयोग केला.

तीन दिवसांत दर्शनेच्छु भक्तांची आणि प्रेक्षकांची तोबा गर्दी उडाली होती. श्रींच्या दर्शनासाठीं समाधिमंदिरांत जायचें झाल्यास तासन्तास पुढील गर्दी ओसरेपर्यंत वाट पाहात थांबणें भाग पडत होतें.

समाधि-मंदिर, गुरुपादुका-मंदिर, द्वारकामाई, श्रींची चावडी या सर्व ठिकाणीं विजेची झगमगीत प्रेक्षणीय रोषणाई करण्यांत आली होती.

या उत्सवप्रसंगीं गरिबांस अन्नदान करण्यांत आलें.

आरोग्य-खात्यानें स्वच्छता ठेवण्याचें काम अत्यंत दक्षतेनें केल्यामुळें एवढी प्रचंड गर्दी होऊनहि रोगराईचा कांहींहि उपद्रव झाला नाहीं.

काठेवाड, गुजरात, मद्रास, म्हैसूर, व महाराष्ट्रांतील दूरदूरच्या गांवाहून सुमारें तीस चाळीस हजार यात्रा या उत्सवाला जमली होती. उत्सवांत बंदोबस्त राखण्यासाठीं राहता, कोपगांव व अहमदनगर येथून आलेल्या पोलीस पथकानें उत्तम व्यवस्था ठेवली होती. कोपरगांवच्या होमगार्डांनीं बहुमोल मदत दिली.

बारा तारखेस ठिकठिकाणांहून आलेल्या प्रसिद्ध व कुशल कुस्तीगीरांच्या प्रेक्षणीय कुस्त्या झाल्या. यशस्वी व विशेष कौशल्य दाखविणाऱ्या मल्लांना बक्षिसें वांटण्यांत आलीं.

संस्थान व्यवस्थापक समितिनें उत्सवाच्या सर्व दिवसांत अहोरात्र खपून, भक्तजनांची गैरसोय होऊं नये आणि सर्व समारंभ यथासांग व्यवस्थित साजरा व्हावा म्हणून आटोकाट परिश्रम केले.

एकंदरींत हा महोत्सव अत्यंत आनंदपूर्ण आणि संस्मरणीय असा झाला.

# आचरती संत असिधाराव्रत—

आचरती संत । असिधाराव्रत
भेटे त्यांसि तदा । जगदीश ॥ १ ॥
भक्तांचा नंतर । होई दासानुदास
लज्जा नाहीं त्यास । मनमोहना ॥ २ ॥
नको ममत्व धरूं । घरदारादि वित्ता
निश्चित जाण चित्ता । क्षणभंगुर ॥ ३ ॥
एक अविनाशी तत्त्व । परब्रह्मस्वरूप
निर्गुण निरूप । निराकार ॥ ४ ॥
ब्रह्मादि देवा । नाकळे अनंत
विश्वव्यापुनि उरत । दशांगुळें ॥ ५ ॥
सगुण स्वरूप । संत हे निश्चित
मर्म ते जाणीत । ऋषीकेशा ॥ ६ ॥
ढोंगाचिये संता । नाहीं तो दुष्काळ
वावरती नाठाळ । स्वार्थापायीं ॥ ७ ॥
बाहेरचा देखावा । दावी हुबेहूब
भस्म गंध सांब । जटाधारी ॥ ८ ॥
ऐशा नकली संता । राही अलग दूर
तत्वाचे ते सूर । भयंकर ॥ ९ ॥
पैलतीर मोक्षा । ऐवजी डुंबतील
डुंबवितील सकलां । भवार्णवीं ॥ १० ॥
क्षणाचिये पत्नी । अनंताचि माता
शेजेचिये कांता । आदिमाया ॥ ११ ॥
जाणुनी संतांची । लक्षणें ती पांच
न होए कधी जाच । संसाराचा ॥ १२ ॥
निरपेक्ष निर्वैर । मुनिश्शांत गंभीर
श्रुति ब्रह्मनिष्ठ । समदर्शी ॥ १३ ॥
जयाचिये अंगीं । बिंबलीं ही लक्षणें
संत दास तेणें । विठ्ठल केला ॥ १४ ॥
दत्त शिव विठ्ठल । साई पांडुरंग
जिंकिला अनंग । सर्वसाक्षी ॥ १५ ॥

—डॉ. श्रीनिवास बालकृष्ण देव




## मार्च १९५४

शिरडीस येणाऱ्या भाविक भक्तजनांची गर्दी या महिन्यांत वाढत्या प्रमाणावर होती.

महाशिवरात्रीनिमित्त श्रींच्या पालखीची मिरवणूक गांवांतून निघाली होती. मिरवणुकींत सर्व जातींच्या, धर्मांच्या व थरांच्या भक्तांनीं उत्साहानें भाग घेतला होता.

याखेरीज विविध प्रकारचे धार्मिक, बोधप्रद आणि मनोरंजक कार्यक्रम करण्यांत आले.

या महिन्यांत झालेले अनेक कार्यक्रम पुढीलप्रमाणें:—

**गायन**—गंगूबाई हनगल, पंडितराव नगरकर, जगन्नाथबुवा पुरतकर आणि शिवकुमार वसवय्या स्वामी.

**कीर्तन**—सौ. पद्मावती देशपांडे, श्रीमती गंगूबाई देशमुख.

**प्रवचन**—सौ. कमलादेवी डी. शहा.

**वादन**—शंकरराव गायकवाड यांचें सनईवादन

या महिन्यांत शिरडीचें हवामान उत्तम होतें.

संस्थानतर्फें चालविण्यांत येणाऱ्या धर्मार्थ दवाखान्यांत या महिन्यामध्यें १४३० रुग्णांवर उपचार करण्यांत आले.

### दवाखान्यांस मिळालेल्या देणग्या—

मेजर सरदार पाटणकर, कोल्हापूर रु. १२५–०

एक साईभक्त, पुणें...............१००१–०

एक साईभक्त, मुंबई...............१०१–०

**शोचनीय निधन:**— संस्थानच्या मुक्तद्वार वाचनालयाचे व्यवस्थापक श्री. आराध्ये यांचें ता. ४ मार्चला देहावसान झालें. श्रीसाईलीलेचे शिरडी येथील प्रतिनिधि म्हणूनहि ते काम पाहात असत. स्वभावानें मनमिळाऊ, आपल्या कामांत दक्ष आणि स्नेहप्रिय असल्यामुळें त्यांच्या निधनानें सर्वांनाच अत्यंत हळहळ वाटली. श्रीसमर्थ साईमहाराज त्यांच्या आत्म्याला शांति देवो.

# एप्रिल १९५४

भक्तांची रीघ अधिकाधिक प्रमाणावर चालू आहे.

संस्थानच्या वतीनें एक मुक्तद्वार वाचनालय चालविण्यांत येत आहे. त्यांत धार्मिक ग्रंथ, पोथ्या, मासिकें, दैनिकें इत्यादि साहित्य अधिकाधिक अद्यावत् संग्रहित करण्याची कोशीस होत आहे.

रामनवमीचा उत्सव थाटामाटानें साजरा झाला (उत्सवाचें वृत्त अन्यत्र दिलें आहे.)

या महिन्यांतील कांहीं विशेष कार्यक्रम पुढीलप्रमाणें.

**कीर्तन**—तात्यासाहेब कवठाळकर, सौ. इंदिराबाई धोत्रे.

श्री. विठ्ठलराव मराठे यांचीं, श्रीसंत भाऊमहाराज व श्रीसद्गुरुस्वामी अक्कलकोटमहाराज यांच्या पुण्यतिथींनिमित्त कीर्तनें झालीं.

या महिन्यामध्यें संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्यांत १२१६ रुग्णांवर उपचार करण्यांत आले.

## दवाखान्यास मिळालेल्या देणग्या

| | |
|---|---|
| श्री. डी. डी. नेरॉय, मुंबई | १०१—० |
| श्री. मधजू व्ही. घोल्हे, मुंबई | ११—० |
| सौ. पी. घोडीपल्ली, मद्रास | ११—० |
| सौ. वरचा होम, मद्रास | २०—० |
| श्री. जी. एम्. लट्टे, मद्रास | १५—० |

**द. ब. राणे**
सं. चिटणीस, शिरडी संस्थान

---

## दादर-माटुंगा कीर्तन मंडळ, दादर

वरील संस्थेचा १३ व्या वर्षाचा अहवाल आमच्याकडे आला आहे. ह्या अहवालावरून ह्या संस्थेची अत्यंत प्रशंसनीय प्रगति होत आहे असें दिसून येत आहे. कीर्तनसंस्था ही नारदमुनीची पवित्र अशी गादी आहे. ही संस्था जिवंत रहावी, लोकप्रिय व्हावी आणि सर्वांना मार्गदर्शक व्हावी ह्या उद्देशानें ह्या संस्थेच्या विद्यमानें दरसाल २५।३० कीर्तनें होत असतात. ह्या सर्व कीर्तनांचा खर्च सांभाळूनही ह्या संस्थेच्या कार्यकर्त्यांनीं बिल्डिंग फंडासाठीं जवळ जवळ रु. ८००० गंगाजळी उभी केली आहे ही अत्यंत स्तुत्य गोष्ट आहे. ह्याबद्दल संस्थेचे सन्मान्य अध्यक्ष श्रीयुत पालेकर व त्यांचे सहकारी यांचे आम्हीं हार्दिक अभिनंदन करतों.

*

* अंगं गलितं पलितं मुण्डम् ।
दशन विहीनं जातं तुण्डम् ।
वृद्धो याति गृहीत्वा दण्डम् ।
तदपि न मुञ्चति आशापिण्डम् ॥ — चर्पट पंजरिका